दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२९१ मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जातिमुक्त समाजाच्या दिशेने ठाम पाऊल

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा या छोट्याशा गावाने विशेष ग्रामसभेत मंजूर केलेला जातिमुक्त समाजाचा ठराव हा केवळ स्थानिक प्रशासनाचा निर्णय नाही, तर सामाजिक क्रांतीची बीजे रोवणारा उपक्रम आहे.

# भारत-विस्तार एआय आजपासून शेतकऱ्यांसाठी उपलब्ध

## कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते उद्घाटप, विविध शेतकी योजनांची माहिती एकत्रीत मिळणार



दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात भारत विस्तार अर्थात व्हर्च्युअली इंटिग्रेटेड सिस्टीम टू ॲक्सेस ॲग्रिकल्चरल रिसोर्सेस या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित टूल्स घोषणा केली होती. हेच भारत विस्तार एआय टूल शेतकऱ्यांसाठी मंगळवारपासून (दि.१७) खुले करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने समाज माध्यमावर पोस्ट करून दिली आहे.**

सध्या दिल्लीमध्ये सुरू असलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'च्या पार्श्वभूमीवर मंगळवारी जयपूर येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान आणि राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या हस्ते भारत विस्तार एआयचे उद्घाटन होणार आहे. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यासाठी भारत विस्तार एआय टूलची घोषणा करण्यात आली. त्यासाठी १५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली. याममध्ये एआय आधारित बहुभाषिक डिजिटल टूल सुरु करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत मोबाईल किंवा साध्या फोन कॉलद्वारे शेतीसंबंधित माहिती देणे हा या टूलचा उद्देश आहे. भारत विस्तार एआय हे बहुभाषिक टूल आहे. ॲग्रीस्टॅक आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या शेती शिफारशीच्या पद्धतीला त्याच्याशी जोडण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल उत्पादना क्षमता वाढवणे, जोखीम टाळणे आणि योग्य निर्णय घेण्यासाठी टूल मदत करेल, असा केंद्र सरकारचा दावा आहे. भारत-विस्तारद्वारे शेतकऱ्यांना पीक नियोजन, पिक पद्धती, कीड व रोग नियंत्रण, हवामान अंदाज, बाजारभाव, शासकीय योजना माहिती, पात्रता व अर्ज प्रक्रिया, तक्रार निवारण ही सेवा सुरुवातीला हिंदी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पुढील टप्प्यात प्रादेशिक ▶▶ पान २ वर

### १० प्रमुख केंद्रीय योजनांची माहिती

या प्लॅटफॉर्मवरून शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना, पंतप्रधान पिक विमा योजना, माती आरोग्य कार्ड, मॉडिफाइड इंटरेस्ट सबव्हेन्शन योजना, कृषी यांत्रीकीकरण उप अभियान, प्रति थेंब अधिक पिक, पंतप्रधान कृषी सिंचन योजना, पंतप्रधान अन्नदाता उत्पन्न सुरक्षा अभियान, ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड, किसान क्रेडिट कार्ड आणि हवामान व कीडसंदर्भातील अलर्टही मिळणार आहेत.

### शेतकऱ्यांना अशा पद्धतीने करात येणार वापर

'भारती' नावाचा एआय व्हॉईस असिस्टंट या प्लॅटफॉर्ममध्ये असणार आहे. शेतकरी १५५२६१ या क्रमांकावर कॉल करून थेट माहिती मिळवू शकतात. त्यासाठी कोणतेही वेगळे ॲप डाउनलोड करण्याची गरज नाही. तसेच विशेष तांत्रिक कौशल्याची आवश्यकता नाही. शेतकऱ्यांना २४ तास सेवा उपलब्ध असणार आहे. यामध्ये 'कृषी साथी' नावाचा एआय चॅटबॉट ऑडिओ मजकूर किंवा व्हिडिओद्वारे प्रश्न विचारण्याची सुविधा देणार आहे.

# ७५ शाळांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जाची खिरापत !

## अजितदादांच्या निधनानंतर मंत्रालयात धक्कादायक प्रकार, आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप




मुंबई । प्रतिनिधी

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर अवघ्या काही तासांतच ही प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात झाल्याचे उघड झाले आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती देण्यात आली होती. ▶▶ पान २ वर

### आरटीई पासून वाचण्यासाठी हा उद्योग ?

भारतीय संविधानातील अनुच्छेद २९ आणि ३० नुसार अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन व चालवण्याचे विशेष अधिकार दिले आहेत. या दर्जामुळे संबंधित शाळांना अभ्यासक्रम, प्रवेश धोरण, कर्मचारी भरती यामध्ये मोठी स्वायत्तता मिळते. अनेक राज्य नियमांपासून सूट मिळते आणि केंद्राकडून अनुदान मिळण्याची संधीही वाढते. याशिवाय, शिक्षणाचा हक्क कायदा अंतर्गत २५ टक्के गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सक्ती अल्पसंख्यांक शाळांवर लागू होत नाही. परिणामी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना अनुच्छेद २१-अ अंतर्गत हमी दिलेल्या शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण होतो.

### निर्णय रद्द, पण जबाबदारी कुणाची?

घडामोडी उघडकीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय रद्द केला, ही सकारात्मक बाब आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. निर्णय रद्द करणे हे अंतिम उत्तर ठरू शकत नाही; प्रशासनातील उत्तरदायित्व निश्चित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. हा प्रकार केवळ एका विभागापुरता मर्यादित नाही. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास, संविधानिक तरतुदींचा सन्मान आणि गरीब विद्यार्थ्यांचे हक्क या सर्वांचा प्रश्न येथे उपस्थित होतो.

# सुनेत्राताई राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा

मुंबई । प्रतिनिधी



राज्यात एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असताना दुसरीकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कधी होणार याचीही उत्सुकता सर्वांनाच आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानुसार, पदभार स्वीकारत कामाला देखील सुरुवात केली आहे. त्यामुळे, आता राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कधी होणार, अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याची चर्चा आणि उत्सुकता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह इतर पक्षातील नेत्यांनीही लागली आहे. त्यातच,आज सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या राष्ट्रवादीच्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीची तारीख आणि नाव ठरलं आहे.


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीची तारीख ठरली असून २६ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीची कार्यकारिणीची बैठक पार पडणार आहे. याच बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं जाईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय ▶▶ पान २ वर

# जीभ कापायची असेल कापा पण भाजपाला एक्सपोज करणे थांबणार नाही–सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

**अदानी–अंबानी आणि अमेरिकेचे भले करणाऱ्या, संविधान बदलू पाहणाऱ्या भाजपला मी एक्सपोज करतो म्हणून भाजपाला माझी जीभ कापायची असेल तर खुशाल कापा, पण मी थांबणार नाही, भाजपाचा पर्दाफाश करतच राहणार असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ठणकावून सांगितले.**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा आमदार व नेत्यांनी "माझी जीभ कापून आणणाऱ्याला बक्षीस जाहीर केले आहे, माझी जीभ कापल्यानंतर जर भारतीय शेतकर्यांचे अमेरिकेतून होणार्या आयातीपासून संरक्षण होणार असेल, ही अन्यायकारक ट्रेड–डील रद्द होऊन शेतमालाला भाव मिळणार असतील, शेतकरी कर्जमुक्त होणार असेल, भाजप हिंदू–मुस्लिम द्वेषाला खतपाणी घालणार नसेल, चीनने बळकावलेला भूभाग परत मिळणार असेल तर माझी जीभ नक्की कापा. हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, मी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल काहीही चुकीचे बोललो नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांची किर्ती महान आहे, चंद्र जसा वाढत जातो तशीच महाराजांची किर्ती आणखी वाढत जावी, याबाबत दुमत नाही. परंतु भारतीय जनता पक्षाने माझ्या विधानाचा "ध" चा "मा" करून महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न केला, दंगली घडवण्याचा प्रयत्न केला, यामागचे कारस्थान समजून घेतले पाहिजे. एपस्टिन फाईल्समध्ये बरंच काही दडलेलं आहे, त्यावरून जनतेचे लक्ष विचलित करणे हा एक भाग आहे तर अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारामुळे भारतातील शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्थ होणार आहे, महाराष्ट्रातही अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. या सर्व मुद्द्यावर भाजपा सरकारकडे उत्तर नाही म्हणून ▶▶ पान २ वर



# अजितदादांच्या अपघातग्रस्त विमानातील ब्लॅक बॉक्समधील माहिती दोन दिवसांत बाहेर येणार

मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाला पंधरा दिवस होऊन गेले आहेत. अजित पवार यांच्या विमानाला नेमका कोणत्या कारणामुळे अपघात झाला, याचा शोध घेतला जात आहे. या अपघाताचा तपास डीजीसीए आणि एएआयबीकडून सुरु आहे. पण अद्याप तरी अपघाताचे कारण पुढे येऊ शकलेले नाही. अपघाताच्या तपासात मोठा अडथळा आला आहे. त्यामुळे अपघाताचे कारण समोर येण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अपघात झाला. त्यावेळी अजित पवार मुंबईहून पुण्याला जात होते. बारामतीच्या धावपट्टीपासून ५० मीटर अंतरावर त्यांचे विमान कोसळले. भीषण



अपघातात विमानातील सर्वांचा मृत्यू झाला. या विमानात अजित पवारांसह एकूण पाच जण होते. अपघातानंतर विमानाला आग लागली, त्यानंतर मोठा स्फोट झाला. या स्फोटाचा व्हिडीओ दोनच दिवसांपूर्वी समोर आला. अजित पवार व्हिएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानातून प्रवास करत होते. अपघातानंतर विमानाचा ब्लॅक बॉक्स हाती लागला, ▶▶ पान २ वर

# आयुष्मान कार्डद्वारे वर्षात अनेकदा घेता येणार उपचार

## एका वर्षासाठी पाच लाखांची मर्यादा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांसाठी आयुष्मान कार्ड आरोग्य सुरक्षा सुविधा एक चांगली योजना आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रत्येक वर्षी ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा मिळते. वर्षभरात ५ लाखांपर्यंतचे उपचार कितीही वेळा घेता येतात. त्यामुळे एखाद्या रुग्णाला त्या योजनेअंतर्गत पुन्हा रुग्णालयात जाऊन उपचार घेणे शक्य आहे. मात्र, पाच लाखांवर खर्च झाल्यास वरचा खर्च रुग्णाला द्यावा लागणार आहे.**

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्मान भारत कार्ड जारी केले जाते. हे कार्ड आरोग्य खात्याशी जोडलेले आहे आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत दर्जेदार वैद्यकीय सेवा आणि लाभ दिला जातो. हे कार्ड सर्व पात्र लाभार्थ्यांना परवडणारे असून




याद्वारे सुलभ आरोग्यसेवा दिली जाते. या कार्डमुळे रुग्णांवर कॅशलेस उपचार होणार आहेत. त्यामुळे गरीब रुग्णांची अडचण दूर होणार आहे. अर्थात या कार्डमुळे तब्बल ५ लाखांपर्यंतच्या खर्चाचे कव्हर मिळते. याचा फायदा रुग्णाला होता. या योजनेतंर्गत उपचारांच्या संख्येवर मर्यादा नाही. उपचारांची कोणतीच निश्चित मर्यादा नाही. लाभार्थी त्याच्या गरजेनुसार वर्षभरात अनेकदा कार्डचा वापर करू शकतो. पण हा खर्च करण्यासाठी ५ लाखांची मर्यादा निश्चित आहे. ५ लाखांच्या मर्यादेत वार्षिक खर्च करता येतो. म्हणजे या योजनेंतर्गत ५ लाखांच्या मर्यादेपर्यंत जितक्यांदा गरज आहे, तोपर्यंत उपचार घेता येतो, असा नियम आहे. त्यामुळे वर्षभरात ५ लाखांपर्यंत रुग्णालयात मोफत उपचार घेता येतात. ▶▶ पान २ वर

### गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी योजना

ही योजना खास करून गरीब आणि गरजू कुटुंबासाठी तयार करण्यात आली आहे. जे लोक संघटित क्षेत्रासाठी काम करतात. नियमितपणे आयकर भरतात. पगारदार आहेत आणि त्यांचा पीएफ कपात होतो. ते या योजनेसाठी पात्र समजल्या जातात तर ईएसईसी लाभ घेणाऱ्या आणि सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्तींनाही या योजनेचा लाभ देण्यात येत नाही. हे सर्व या योजनेच्या परीघाबाहेर आहेत.

# गुजरातच्या ३२ शाळांना बॉम्बची धमकी

वडोदरा । वृत्तसंस्था

गुजरात राज्यातील ३२ शाळांना ईमेलद्वारे बॉम्बची धमकी देण्यात आली आहे. यात वडोदरा येथील १७ आणि अहमदाबाद येथील १५ शाळांचा समावेश आहे. ईमेलमध्ये लिहिले होते की, गुजरात खालिस्तान बनेल, हिंदुस्तानचे तुकडे होतील. ही माहिती समोर येताच पालक तात्काळ शाळेत पोहोचले आणि त्यांनी मुलांना घरी परत आणले. बॉम्बशोधक पथकाने शाळांमध्ये तपासणी सुरू केली आहे. सध्या शाळा रिकाम्या करण्यात आल्या असून वाहने आणि शाळेच्या परिसराची तपासणी केली जात आहे. खबरदारी म्हणून वडोदरा येथील उर्मी शाळेचे वसतिगृहही रिकामे करण्यात आले. वडोदरा पोलिस आयुक्त नरसिम्हा कुमार यांनी सांगितले की, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शाळांमधून घरी पाठवण्यात आले. याबाबत सायबर क्राईम पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

## थोडक्यात...

### दहशतवादी अबू सालेमच्या सुटकेची याचिका फेटाळली

नवी दिल्लः भारत आणि पोर्तुगीज सरकारांमध्ये झालेल्या प्रत्यार्पण कराराच्या अटींनुसार मुदतपूर्व सुटकेची मागणी करणारा दहशतवादी अबू सालेमची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.१६) फेटाळली. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात त्याला दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया (टाडा) कायद्यांतर्गत दोषी ठरवण्यात आले होते. तथापि, न्यायालयाने त्याला उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली. न्यायालयाने सुटकेची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देत म्हटले की, सालेमने समाजासाठी कोणतेही चांगले काम केले नाही. त्याला टाडा अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे. न्यायालयाने म्हटले की, मुंबई उच्च न्यायालयाने केवळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे.

### अभिनेता राजपाल यादवला दोन अटिवर जामीन

दिल्लीः बॉलिवूड अभिनेता राजपाल यादवला कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. मात्र जामिनासाठी त्यांना दोन महत्वाच्या अटी पाळाव्या लागल्या. आता या प्रकरणाची पुढील सुनावणीची तारीखही निश्चित करण्यात आली आहे. चेक बाऊन्स प्रकरणी दहा दिवस तुरुंगात घालवल्यानंतर राजपाल यादवला जामीन मिळाला आहे. त्याच्या शिक्षेला अंतरिम स्थगिती मिळाली आहे. तुरुंगातून बाहेर येण्यासाठी त्याला दोन अटी पूर्ण कराव्या लागल्या. कोर्टाने नमूद केले की, दिलासा विचारात घेताना त्याच्या बँक खात्यात १.५ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. यादवने १ लाख रुपयांचा वैयक्तिक जातमुचलका आणि त्याच रकमेची एक जामीनपत्र सादर करावे, या अटीवर शिक्षा स्थगित करण्याचे आदेश दिले.

### मोदी–फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांची मुंबईत भेट

दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (१६ फेब्रुवारी २०२६) मुंबईत फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतील आणि त्यांच्या भेटीदरम्यान, दोन्ही नेते भारत–फ्रान्स धोरणात्मक भागीदारीत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इमॅन्युअल मॅक्रॉन यांच्यातील चर्चा धोरणात्मक संबंध मजबूत करण्यावर आणि त्यांना नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये अधिक वैविध्यपूर्ण करण्यावर केंद्रित असेल. पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष इम्यॅन्युअल मॅक्रॉन प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर देखील विचारांची देवाणघेवाण करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ फेब्रुवारी रोजी मुंबईला भेट देतील जिथे ते फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतील, असे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

### आज दुपारी ३:२६ वाजता लागणार सूर्यग्रहण

नवी दिल्ली : वर्ष २०२६ मधील पहिले सूर्यग्रहण मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ (फाल्गुन अमावस्या) रोजी लागणार आहे. भारतीय वेळेनुसार, हे ग्रहण दुपारी ३:२६ वाजता सुरू होईल आणि संध्याकाळी ७:५७ वाजेपर्यंत असेल. तब्बल ४ तास ३० मिनिटे या खगोलीय घटनेचा प्रभाव जाणवेल. जगभरातील खगोलप्रेमींचे या दुर्मिळ घटनेकडे लक्ष लागले आहे. वैज्ञानिक भाषेत याला वलयाकार सूर्यग्रहण असे म्हणतात. या काळात चंद्र पृथ्वीपासून दूर असल्याने तो सूर्याला पूर्णपणे झाकू शकत नाही. परिणामी, सूर्याचा मधला भाग काळवंडतो आणि कडेने एक तेजस्वी प्रकाशवर्तुळ दिसते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,१५१ | ३,४५० | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड :२७.०० क्विंटल | २,३०० | ४,३५१ | ३,५०५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९.०० क्विंटल | ७,२०१ | ७,८५० | ७,६७४ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,०५० | ३,११६ | २,७३७ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,५०० | ५,२०० | ४,७६६ |

अग्रलेख

# जातिमुक्त समाजाच्या दिशेने ठाम पाऊल

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा या छोट्याशा गावाने विशेष ग्रामसभेत मंजूर केलेला जातिमुक्त समाजाचा ठराव हा केवळ स्थानिक प्रशासनाचा निर्णय नाही, तर सामाजिक क्रांतीची बीजे रोवणारा उपक्रम आहे. सार्वजनिक ठिकाणी कोणाच्याही जातीचा उल्लेख न करणे, जातीय तेढ निर्माण करणारा मजकूर समाजमाध्यमांवर न टाकणे, संविधानातील समता व बंधुतेच्या तत्त्वांचे पालन करणे आणि जाणीवपूर्वक जातीय वातावरण बिघडवणाऱ्यांवर कारवाई करणे या स्पष्ट आणि ठोस बाबी या ठरावात नमूद करण्यात आल्या आहेत. गावकऱ्यांनी या निर्णयाला दिलेली साथ हे त्याचे खरे सामर्थ्य आहे.

भारतीय समाजरचनेत जात हा शतकानुशतके खोलवर रुजलेला घटक आहे. सामाजिक ओळख, विवाह, राजकारण, आर्थिक व्यवहार अशा अनेक क्षेत्रांत त्याचा प्रभाव जाणवतो. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजरचना उभी करण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र, कायद्यातील तरतुदी असूनही समाजमानसातील पूर्वग्रह पूर्णपणे नाहीसे झालेले नाहीत. सौंदाळ्याचा निर्णय या मूल्यांना व्यवहारात आणण्याचा प्रयत्न म्हणून पाहता येईल. महाराष्ट्राची संतपरंपरा आणि समाजसुधारकांची परंपरा जातिभेदाच्या विरोधात ठाम उभी राहिली. संत तुकाराम यांनी अभंगातून मानवतेचा संदेश दिला, तर संत ज्ञानेश्वर यांनी सर्वसमावेशकतेची शिकवण दिली. महात्मा ज्योतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या माध्यमातून विषमतेवर प्रहार केला. या विचारांचीच प्रेरणा सौंदाळ्याच्या निर्णयामागे असल्याचे दिसते. आजच्या काळात जातीयतेचे स्वरूप बदलले आहे. समाजमाध्यमांवरून पसरवले जाणारे 'नरेटिव्ह', निवडणुकांमधील जातीय गणिते, आंतरजातीय विवाहांवरून घडणाऱ्या अमानुष घटना या सर्वांनी समाजात अविश्वास आणि दुरावा वाढवला आहे. सार्वजनिकरित्या जातिवादाला विरोध केला जात असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात जात हा राजकारणाचा महत्त्वाचा घटक ठरतो. त्यामुळे सामाजिक सलोखा धोक्यात येतो. अशा परिस्थितीत गावपातळीवरून घेतलेला सामूहिक निर्णय हा आशेचा किरण आहे. तथापि, कागदावरील ठराव आणि प्रत्यक्षातील अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी असते. वर्षानुवर्षे मनात साठलेले पूर्वग्रह एका निर्णयाने नाहीसे होणार नाहीत. बदलासाठी सातत्यपूर्ण जनजागृती, संवाद आणि शिक्षण आवश्यक आहे. गावातील तरुणाई, महिला बचतगट, शाळा आणि स्थानिक संस्था यांचा सक्रिय सहभाग मिळाला तर हा निर्णय अधिक प्रभावी ठरू शकतो. सामाजिक माध्यमांवर संयम राखणे आणि सकारात्मक संदेश देणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. महाराष्ट्रातील अनेक गावांनी यापूर्वीही अनिष्ट प्रथा मोडीत काढत सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. काही गावांनी विधवा प्रथा संपवली, काहींनी दारूबंदी लागू केली, काहींनी मुलगा–मुलगी समानतेसाठी प्रयत्न केले. सामूहिक निर्णयातून निर्माण होणारा नैतिक दबाव लोकांना बदल स्वीकारण्यास प्रवृत्त करतो. सौंदाळ्याचा प्रयोगही अशाच व्यापक परिवर्तनाचा प्रारंभ ठरू शकतो.

सामाजिक परिवर्तन ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. तत्काळ यशाची अपेक्षा निराशा निर्माण करू शकते. मात्र, ध्येय स्पष्ट असेल आणि प्रयत्न सातत्याने होत राहिले तर परिणाम नक्कीच दिसू लागतात. जातिमुक्त समाज घडवणे हे केवळ एका गावाचे ध्येय नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. सौंदाळ्याने पहिले पाऊल टाकले आहे; आता इतर गावांनी आणि व्यापक समाजाने या प्रयत्नाला साथ देणे गरजेचे आहे. जातिमुक्ततेचा प्रवास कठीण आहे, पण अशक्य नाही. सामाजिक सलोखा, परस्पर सन्मान आणि बंधुता यांवर आधारित समाजरचना उभी करण्यासाठी सौंदाळ्याचा निर्णय प्रेरणादायी ठरावा, हीच अपेक्षा.

# संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या प्रमुखांनी घेतली ना.पंकजाताई मुंडे यांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या वातावरणीय बदल विभागाचे संचालक तथा जागतिक प्रमुख मार्टिन क्रुसे यांनी भेट घेऊन विविध विषयांवर व धोरणात्मक बाबींवर चर्चा केली. राज्यातील वाढते शहरीकरण आणि बदलत्या हवामानाचा विचार करता, पर्यावरण संवर्धन ही आता केवळ चर्चा न राहता ती एक 'मिशन मोड' मधील कृती असायला हवी असे श्रीमती मुंडे यांनी यावेळी बोलतांना नमूद केले.**

मुंबईतील शासकीय निवासस्थान रामटेक येथे संचालक मार्टिन क्रुसे यांच्यासोबत 'बीट द हिट' मोहिमेच्या तांत्रिक आणि धोरणात्मक अंमलबजावणीवर श्रीमती मुंडे यांनी सखोल चर्चा केली. यावेळी संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी बेंजामिन हिकमन, कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी मनोजकुमार एम, राज्य वातावरणीय बदल कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे, वरिष्ठ सल्लागार प्राची मर्चंट यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. जागतिक स्तरावरील अनुभवांची जोड देऊन महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेवर मात करण्यासाठी एक भक्कम आराखडा तयार करण्याबाबत या दोन्ही मान्यवरांमध्ये यावेळी सकारात्मक चर्चा झाली. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शीतकरण ही चैनीची नव्हे तर



विकासाची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. शाश्वत शीतकरण सर्वांसाठी परवडणारे, ऊर्जा कार्यक्षम आणि शहरी पुनर्विकास व गृहनिर्माण आराखड्यात समाविष्ट असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उत्सर्जन वाढवणाऱ्या पारंपरिक विकासाऐवजी जिल्हास्तरीय कूलिंग प्रणाली, निष्क्रिय (पॅसिव्ह) डिझाइन पद्धती आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले. उष्णतेच्या वाढत्या जागतिक संकटाकडे लक्ष वेधताना संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे हवामान बदल संचालक मार्टिन क्रुसे यांनीही मोठ्या प्रमाणावर राबवता येतील अशा व्यवहार्य उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. महाराष्ट्र शासनाचा 'बी कूल' प्रकल्प शहर, परिसर आणि इमारत पातळीवरील शीतकरण उपायांना चालना देणार असून त्याला तांत्रिक कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची जोड मिळणार आहे. यासोबतच वैज्ञानिक नदी पुनरुज्जीवन, उपग्रहाधारित मिथेन निरीक्षण, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, दुग्ध व कृषी क्षेत्रासाठी अक्षय ऊर्जेवर आधारित कोल्ड चेन आणि हवामान–संवेदनशील शहरी प्रशासनावरही भर दिला जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सध्या चार शहरांमध्ये 'क्लायमेट ॲक्शन सेल' कार्यान्वित झाले असून आणखी सहा शहरांमध्ये प्रक्रिया सुरू आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून पर्यावरणीय संरक्षण आर्थिक विकासाला बळ देणारे ठरेल, असा विश्वास मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला.

# बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील सर्व अडथळे तत्काळ हटवा–डॉ.योगेश क्षीरसागर



## वाहतूक पोलिसांच्या नेमणुकीसाठी पोलीस अधीक्षकांना भेटणार

अंबिका चौक, राजीव गांधी चौक या वर्दळीच्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याबाबत पोलीस अधीक्षकांना भेटून चर्चा करणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

बीड । प्रतिनिधी

**शहरातील अत्यंत वर्दळीचे अंबिका चौक आणि राजीव गांधी चौक येथील वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्माण झालेले सर्व प्रकारचे अडथळे तात्काळ हटविण्याच्या सूचना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि संबंधित यंत्रणेसोबत सोमवारी (दि.१६) दोन्ही चौकांची प्रत्यक्ष पाहणी केली.**

अंबिका चौकातील सुशोभीकरणामुळे वारंवार निर्माण होणारा वाहतुकीचा अडथळा दूर करण्याबरोबरच परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची गरज आहे. तसेच, राजीव गांधी चौकातील मध्य रस्त्यात उभा असलेला विजेचा खांब तातडीने हलविण्याची मागणीही करण्यात आली. अंबिका चौकातील रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) अन्यत्र हलविण्याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली. ही कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी महावितरण कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचना डॉ.क्षीरसागर यांनी दिल्या. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी दोन्ही चौकातील समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देत संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वाहतुकीची सुलभता वाढविण्यासाठी प्रशासनाने त्वरीत उपाययोजना कराव्यात, असेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी स्थानिक नागरिकांसह भाजपचे युवा नेते नागेश तांबारे, नगरसेवक मंगेश धोंगडे, सरपंच अमोल बागलाने, राजू महुवाले, बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

# तमाशा मध्ये दगडफेक १४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

मंठा । प्रतिनिधी

**मंठा तालुक्यातील पाटोदा येथे तमाशा समोर दहा ते १४ व्यक्तीने अचानक दगडफेक केल्याने या दगडफेकीमध्ये होमगार्ड जखमी झाल्याचे माहिती समोर आली आहे. राहुल मनोहर पवार (वय २३), होमगार्ड, यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजेच्या सुमारास पाटोदा शिवारातील यात्रेत घडलेल्या घटनेप्रकरणी १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यात्रेदरम्यान तमाशा मंडळासमोर काही व्यक्तींमध्ये वाद सुरू होता. त्या वेळी पोलिस कर्मचारी लोकनाट्य मंडळाजवळ उपस्थित नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करीत असताना, संबंधित जमावाने पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून शिवीगाळ व दगडफेक केल्याचा आरोप आहे. या दगडफेकीत फिर्यादी राहुल पवार यांच्या डाव्या पायाच्या नळीवर, गुडघ्याखाली मार लागून ते जखमी झाले. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपी म्हणून १) रोहित संतोष अवचार, २) ज्ञानेश्वर देवीदास खरात, ३) मनोज गोरे, ४) मोहन गोरे, ५) अमोल गोरे, ६) काका रेंगे, ७) आलम शेख (पूर्ण नाव माहित नाही), ८) आदी महादेव अवचार, ९) पवन दादाराव गोरे, १०) आदित्य भगस, ११) गोविंद रेंगे, १२) महेश अवचार, १३) दिपक गोरे, १४) वैभव अवचार (पूर्ण नाव माहित नाही) सर्व रा. विडोळी ता. मंठा जि. जालना तसेच अन्य ८ ते १० अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश इधाटे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# महावितरणाच्या विरोधात नगरसेवकासह नागरिकांचा ठिय्या

## आ.विजयसिंह पंडितांकडून दखल एसपींना लावला फोन

बीड । प्रतिनिधी

**महावितरणचा बेजबाबदारपणा आणि हायटेक कंपनीच्या निष्काळजीपणामुळे बालेपीरच्या गोरे वस्ती भागातील शेख आवेज शेख परवेज या १५ वर्षीय मुलाचा उघड्या डीपीला चिटकून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना रविवारी सायंकाळी घडली होती. या प्रकरणात महावितरणचे संबंधित अधिकारी आणि हायटेक कंपनीविरूध्द तात्काळ गुन्हा दाखल करा अशी मागणी करत नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब यांच्यासह नगरसेवक व नागरीकांनी जिल्हा रूग्णालयाच्या बाजूला असलेल्या हायवेवर सोमवारी तब्बल दीड तास रास्ता रोको केला. भर उन्हात शेख मुजीब यांच्यासह नगरसेवक आणि नागरीक रोडवर ठिय्या मांडून बसले होते. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उठणार नाहीत अशी आक्रमक भुमिका यावेळी आंदोलकांनी घेतली होती. अखेर आ.विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करत नंतर आंदोलकांशीही मोबाईलवरूनच संवाद साधून या प्रकरणात तातडीने कारवाई करू असे आश्वासन पोलीस अधिक्षकांनी दिल्याचे सांगितले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.**



बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथील शेख आवेज शेख परवेज या १५ वर्षीय मुलाच्या मृत्यूस कारणीभूत असलेले महावितरण संबंधित अधिकारी आणि त्याची जबाबदारी असलेल्या हायटेक कंपनीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी मयत मुलाच्या नातेवाईकांनी केली होती. आज सकाळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, राष्ट्रवादी काँग्रेसचे माध्यम प्रमुख भागवत तावरे, नगरसेवक महेश धांडे, नगरसेवक रोहिल दादा, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक मकसुद खान, नगरसेवक खय्युम इनामदार, ॲड.सय्यद खाजा, मोहम्मद सादेक मेंबर, शाहेद पटेल यांच्यासह नागरीकांनी आज सकाळी जिल्हा रूग्णालयाच्या परिसरातील शवविच्छेदन गृहासमोर हायवेवर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. तब्बल दीड तास सर्व आंदोलक भर उन्हात रस्त्यावर ठिय्या मांडून बसले होते. घटनास्थळी पोलीस उपअधिक्षक पुजा पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.शिवाजी बंटेवाड, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव आदिंनी भेट दिली. आ.विजयसिंह पंडित यांनीही या प्रकरणाची दखल घेत तातडीने पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याशी मोबाईलवरून चर्चा करून त्यांना घटनेची माहिती सांगितली. पोलीस अधिक्षकांनी या प्रकरणात तातडीने चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर हा रस्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथील १५ वर्षीय शेख आवेज शेख परवेज याचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडल्यानंतर या भागातील नागरीकांसह नातेवाईकांनी आक्रमक भुमिका घेतली होती. उघड्या डीपीला चिटकल्याने शॉक बसून त्याचा मृत्यू झाल्याने याला महावितरणचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. मात्र आज सकाळपर्यंत महावितरणने या प्रकरणाची कसलीच दखल घेतली नव्हती. त्यामुळे शेवटी लोकप्रतिनिधींना आणि नागरीकांना रस्त्यावर उतरावे लागले, आंदोलन करावे लागेल. त्यानंतर पोलीस प्रशासनाने चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्याने आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुलाचा मृतदेह नातेवाईकांनी ताब्यात घेतला. आ.विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करून घटनेची माहिती दिली. या प्रकरणी लोकांच्या भावना त्यांच्या समोर मांडल्या. त्याची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी या सर्व घटनेची चौकशी करून कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आ.विजयसिंह पंडित यांनी मोबाईलवरून आंदोलकांशी संवाद साधून पोलीस अधिक्षकांशी झालेल्या चर्चेची आणि त्यांनी दिलेल्या कारवाईच्या आश्वासनाची माहिती दिली. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# सत्तेच्या बळावर नियम धाब्यावर; राठी डिपार्टमेंटलच्या अनधिकृत कामावर जिल्हा प्रशासनाचा डोळेझाक

जालना । प्रतिनिधी

**जिल्हा प्रशासन अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालत असून,सर्वसामान्यांसाठी कायदे आणि बड्या धेंडांसाठी पायघड्या अशी दुटप्पी भूमिका घेत असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू असलेल्या 'राठी डिपार्टमेंटल'च्या ६ ते ७ मजली अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश देऊनही प्रशासन कारवाईस टाळाटाळ करत आहे. तक्रारदार श्री.बाबासाहेब घोलप यांनी थेट आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतरही प्रशासन सुस्त असल्याने संताप व्यक्त होत आहे.**

सर्वे नं. ९५/१ मधील प्लॉट नं. १८–५९–९ व १८–५९–४ वर सुरू असलेल्या या बांधकामाबाबत नगर परिषदेने स्वतःच मान्य केले आहे की,हे बांधकाम परवानगीपेक्षा जास्त मजल्यांचे आणि पूर्णतःअनधिकृत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२ आणि ५३ अन्वये हे बांधकाम निष्कासित करण्याबाबतच्या नोटीस केवळ कागदावरच राहिल्या आहेत. ३० दिवसांचा अवधी उलटूनही प्रशासन कारवाई का करत नाही,असा प्रश्न उपस्थित होत आहे. तक्रारदार श्री.बाबासाहेब घोलप यांनी अतिशय गंभीर आरोप केले आहेत.त्यांनी पत्रात नमूद केले आहे की,''संबंधित बांधकाम मालक व कर्मचाऱ्यांना मॅनेज करून,सर्व आदेश धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकाम सुरूच ठेवत आहे''. प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचारी आणि बिल्डर यांच्यातील या साटेलोट्यामुळे शहराचे नियोजन धोक्यात आले असून,कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.वारंवार तक्रारी करून आणि निवेदने देऊनही ठोस कारवाई होत नसल्याने,हताश झालेल्या तक्रारदाराने थेट आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. २५ जानेवारी २०२६ पासून नगर परिषदेसमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२६ च्या पत्राद्वारे त्यांनी पुन्हा प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे सर्वसामान्यांच्या छोट्याशा बांधकामावर कारवाई करण्यासाठी तत्परता दाखवणारे प्रशासन,राठी डिपार्टमेंटलच्या अनधिकृत बांधकामाबाबत इतकी मवाळ भूमिका का घेत आहे? प्रशासनावर कोणाचा दबाव आहे? कारवाई टाळणाऱ्या विरुद्ध कारवाई होणार का? या प्रश्नांची उत्तरे अंबडकर शोधत आहेत.प्रशासनाने तातडीने हे अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल,असा इशारा तक्रारदार घोलप यांच्या कडून दिला जात आहे.



# पान १ वरून...

### भारत–विस्तार एआय आजपासून

भाषेतही माहिती मिळणार आहे, अशी माहिती कृषी मंत्रालयाने दिली आहे. केंद्र सरकारच्या दिलेल्या माहितीनुसार, भारत–विस्तार हे केवळ ॲप नसून केंद्र व राज्य प्रणालींना जोडणारा राष्ट्रीय डिजिटल कणा आहे. यामध्ये राज्यांची स्वायत्तता कायम ठेवत एकात्मिक डिजिटल व्यवस्था उभी केली जाणार आहे.हा प्लॅटफॉर्म 'भारत एआय मिशन' आणि भाषिणी यांसारख्या राष्ट्रीय एआय उपक्रमांचा लाभ घेईल. स्वयंसेवी संस्था, एआय स्टार्टअप्स, तंत्रज्ञान कंपन्या आणि एआय सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या सहकार्याने हा प्रकल्प पुढे विकसित केला जाणार आहे.

------------

### ७५ शाळांना घाईघाईने

मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर ही स्थगिती डावलून मंत्रालयातून गुपचूपपणे प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पहिले प्रमाणपत्र २८ जानेवारी रोजी, अजित पवार यांच्या अपघाताच्या दिवशीच दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी देण्यात आले. राज्यात शासकीय दुखवटा सुरू असताना मंत्रालयात ही प्रक्रिया कशी आणि कोणाच्या आदेशाने राबवली गेली, असा सवाल उपस्थित होत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माणिकराव कोकाटे, दत्तात्रय भरणे आणि अजित पवार यांनी यापूर्वी ही प्रमाणपत्रे रोखून धरली होती. मात्र, त्यांच्या निधनानंतर अचानक ही प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारेखान यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचा प्रकार अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर सीआडीमार्फत चौकशी करून मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. अशा दर्जामुळे शाळांना दीर्घकालीन आर्थिक लाभ होऊ शकतो. शुल्क नियंत्रणातून सूट, अनुदान आणि नियामक बंधनांपासून मुक्तता यामुळे कोट्यवधी रुपयांचा फायदा होऊ शकतो. त्यामुळेच या प्रक्रियेतील पारदर्शकता आणि हेतू यांची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे.

-------------

### अजितदादांच्या अपघातग्रस्त विमानातील

पण तो जळालेल्या अवस्थेत होता. त्यामुळे त्यातील डेटा रिकव्हर करण्यात अडचणी येत आहेत. ब्लॅक बॉक्समधील डेटा बाहेर काढण्यासाठी तो परदेशात पाठवला जाण्याची दाट शक्यता आहे. याबद्दलचा निर्णय १ ते २ दिवसांत घेतला जाऊ शकतो. तशी माहिती केंद्रीय विमान उड्डाण प्रशासनातील सुत्रांनी दिली आहे. एएआयबीकडून विमान अपघातामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. गेल्या वर्षी अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. लंडनला जाणारे विमान उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांत कोसळले. या विमानाचा ब्लॅक बॉक्स सुस्थितीत होता. त्यामुळे त्यातील डेटा भारतातच रिकव्हर करण्यात आला. पण अजित पवार प्रवास करत असलेल्या विमानातील ब्लॅक बॉक्स जळालेल्या स्थितीत सापडला आहे. त्यामुळे त्यातील डेटा रिकव्हर करण्यात अडथळे येत आहेत. अजित पवार लियारजेट विमानातून प्रवास करत होते. या विमानाची निर्मिती अमेरिकेत झालेली आहे. त्यामुळे या विमानाचा ब्लॅक बॉक्स अमेरिकेला पाठवला जाईल. त्यातील डेटा रिकव्हर करण्यासाठी कंपनीची मदत घेतली जाईल. ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवण्याबद्दलचा निर्णय येत्या १ ते २ दिवसांत घेतला जाणार आहे.

----------

### जीभ कापायची असेल कापा पण भाजपाला

या सर्व मुद्द्यावर भाजपा सरकारकडे उत्तर नाही म्हणून या प्रश्नांवर भाजपाला पडदा टाकायचा आहे, यासाठी हा सर्व खटाटोप सुरु असल्याची टीका केली.

---------

### आयुष्मान कार्डद्वारे वर्षात

त्यामुळे रुग्णांची सोय झाली आहे.आयुष्मान कार्ड तयार करण्यासाठी अर्जदाराला जवळच्याच कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये जावे लागेल. तिथे तुम्ही या योजनेसाठी पात्र आहात की नाही हे तपासतो. तुम्ही योजनेसाठी पात्र असाल तर तुमच्या कागदपत्रांची पडताळणी होते. त्यानंतर अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. अर्ज स्वीकारल्यानंतर लाभार्थी काही वेळेत आपले कार्ड डाऊनलोड करू शकतो.

--------

### सुनेत्राताई राष्ट्रवादीच्या

अध्यक्षपदाच्या निवडीवरुन दोन्ही राष्ट्रवादीतील पदाधिकारी आणि आमदार, खासदारांमध्ये काही प्रमाणात सुरू असलेल्या चर्चेला आता पूर्णविराम मिळणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रवादीच्या आमदार, खासदार आणि प्रमुख नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसंदर्भाने चर्चा करण्यात आली असून २६ फेब्रुवारी रोजी ही निवड करण्यात येणार असल्याचे समजते. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रफुल पटेल यांचे नाव आघाडीवर होते, त्यातच केंद्रीयमंत्री पियुष गोयल यांनीही एका मुलाखतीत त्यांचं नाव घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगळीच चर्चा सुरू होती. मात्र, आता राष्ट्रवादीकडून सुनेत्रा पवार यांचेच नाव निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे.

## थोडक्यात



### स्व.अमित कोमटवार यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शालेय साहित्य वाटप

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील युवा अमित दिलीप कोमटवार यांचे गतवर्षी अकाली अपघाती निधन झाले होते. त्यांचा पुण्यस्मरण व जयंती दिनानिमित्त शनिवारी येथील जिल्हा परिषद केंद्रीय (कन्या-मुलांची) प्राथमिक व शिवाजीनगर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

येथील पंचक्रोशीत विक्की कोमटवार यांची विशेष ओळख होती. सामाजिक कार्यात कोमटवार आग्रही सहभागी असायचे. त्यांच्या पुण्यस्मरणाच्या औचित्याने माजी सरपंच बंधू अजय कोमटवार यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाच्या दप्तराचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दिंद्रुड येथील माजी सरपंच दिलीप कोमटवार, सरपंच प्र. भाऊसाहेब सुरवसे, माजी पंचायत समिती सदस्य कैलास ठोंबरे, मधुकर देशमाने, माजी सरपंच अतुल ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य नारायण चांदबोधले, भारत गौंडर, विलास पारेकर, गोविंद ठोंबरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, द्रोपदी शिवहार कटारे, केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, मंचक सोळंके सह पत्रकार संघाचे पदाधिकारी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. दोन्ही शाळेतील एकूण ३५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी अनेकांनी स्व. विक्की कोमटवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. सुत्रसंचलन सहशिक्षक मनोहर कटारे यांनी तर आभार सिद्धेश्वर बोकन यांनी व्यक्त केले.

### भैरवनाथ विद्यालय अरणविहिरा शाळेत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप




कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अरणविरहीरा येथे असलेल्या भैरवनाथ विद्यालय मध्ये दहावी विद्यार्थी विद्यार्थांना निरोपि समारंभ उत्साहात पार या कार्यक्रमासाठी संज्येचे अध्यक्ष मधुकरराव तांदळे साहेब, १००८ ह.भ.प. राजाराम महाराज शास्त्री यांनी सुषग्रामशम त्याचप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवदास शेकडे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. शेकडे के. बी. सर यांनी केले. हभप राजाराम महाराज शास्त्री यांनी विदयाथ्र्याचे उत्तम व सु-सुंस्कार सिक क्षम नागरिक त्याचप्रमाणे अविष्यात योग्य संगत करून चांगल्या ठिकाणी नोकरी व अन्य क्षेत्रात प्राविण्य मिळावे असे शुभअशिवदि दिले. त्याचप्रमाणे मधुकरराव तादळे साहेब यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक भी शिवदास सर योनी विदयार्थक) मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे सर्व शिक्षकाने विदयार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. श्री पी .जे यांनी आभारप्रदर्शन केले. या. कार्यक्रमाचे आंधळे सर व सर व इ.९वी सर्व विदयार्थ्यांनी यशस्वी केले, या शुभ प्रसंगी सर्व विद्यार्थ्यी, सर्व ग्रामस्थ व आमच्या वृपत्राचे प्रतिनिधी प्रेम पवळ उपस्थित होते.

## मटका, जुगार व अवैध दारूवर धडक कारवाई

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांनी दि १४ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून मटका, जुगार व अवैध दारू विक्रीवर कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम व दारूसह एकूण २ लाख १० हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पथक तयार करून छापेमारी करण्यात आली. तानाजी नगर येथे छापा टाकून अवैधरित्या देशी दारू विक्री करणाऱ्या रामेश्वर रोहिदास झुटे याच्याकडून ८८० रुपयांची देशी दारू जप्त करण्यात आली. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यानंतर तानाजी नगर परिसरातच विजय मारुती कुऱ्हाडे व बुक्की मालक पप्पू शेख हे कल्याण मटका जुगार चालवत असल्याचे आढळून आले. त्यांच्या ताब्यातून १ हजार ५८० रुपये रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र



२ लाख दहा हजाराचा मुद्देमाल जप्त

जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच अरफात मोहल्ला येथे उघड्या जागेत माजेद दौला शेख हा बेकायदेशीर पत्त्यांचा क्लब चालवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. या कारवाईत रोख रक्कम व मोटारसायकलसह एकूण २ लाख ८ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून क्लब मालक माजेद दौला शेख व इतरांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या पथकाने केली.

## माजी नगराध्यक्ष राधेश्याम अट्टल यांचे अपील फेटाळले; मंदिर ट्रस्टचा मालकी हक्क कायम

### अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांचा धाडसी निर्णय

बीड । प्रतिनिधी

गेवराई येथील लक्ष्मीनारायण मंदिरच्या ऐतिहासिक जमीन प्रकरणात माजी नगराध्यक्ष राधेश्याम अट्टल यांना मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे. मौजे कोल्हेर, ता. गेवराई, जि. बीड येथील गट क्रमांक ५१ संदर्भातील फेरफार प्रकरणात दाखल केलेले अपील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाने सविस्तर सुनावणीनंतर अमान्य केले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत दाखल या अपीलमध्ये फेरफार क्रमांक ३२१ व ११०४ बाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांनी २५ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते. मात्र अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांनी सर्व कागदपत्रे, ७/१२ उतारे, मृत्युपत्र, फेरफार नोंदी तसेच सार्वजनिक ट्रस्ट नोंदणी अभिलेखांचा सखोल अभ्यास करून उपविभागीय अधिकाऱ्यांचा आदेश योग्य व कायदेशीर असल्याचे ठामपणे मान्य केले.

आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, फेरफार क्रमांक ३२१ हा मूळतः गट क्रमांक १७० व १७०/२ शी संबंधित असून तो गट क्रमांक ५१ शी थेट संबंधित नाही. त्यामुळे सदर फेरफार गट क्रमांक ५१ च्या ७/१२ उताऱ्यावर घेतलेला वैध व कायदेशीर आधाराविना असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच रघुनाथदास शिवजीराम अट्टल यांनी २६ फेब्रुवारी १९५९ रोजी केलेल्या मृत्युपत्रानुसार (फेरफार क्र. ९२) सर्व्हे नं. ६ व ८ (नंतरचा गट क्र. ५१) या जमिनीचे उत्पन्न श्री लक्ष्मीनारायण मंदिराच्या पूजा-अर्चेसाठी वापरण्याचा स्पष्ट उल्लेख असल्याचे आदेशात नमूद आहे. हा फेरफार आजतागायत रद्द झाल्याचा कोणताही सक्षम पुरावा सादर करण्यात आलेला नाही. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे स्पष्ट केले की, फेरफार क्रमांक ११०४ हा इतर गट क्रमांकांसाठी वैध राहू शकतो; मात्र गट क्रमांक ५१ ही सार्वजनिक ट्रस्ट - श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट, गेवराई (नोंदणी क्र. --१८५७) यांची मालमत्ता असल्याने त्या हद्दीपुरता फेरफार ११०४ रद्द करणे अपरिहार्य आहे. अंतिम आदेशात गट क्रमांक ५१ च्या मालकी रकान्यात श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट, गेवराई अशी नोंद घेण्याचे आदेश तहसीलदार व तलाठी यांना देण्यात आले असून, प्रकरणातील सर्व स्थगन किंवा जैसे-थे आदेश रद्द करण्यात आले आहेत.

लक्ष्मीनारायण मंदिराची जमीन ही कोणाच्या खाजगी फायद्यासाठी नव्हे, तर श्रद्धा, परंपरा आणि सार्वजनिक ट्रस्टसाठी आहे. १९५९ च्या मृत्युपत्रापासून ते चॅरिटी कमिशनरच्या नोंदींपर्यंत सर्व कागदपत्रे मंदिराचाच हक्क सिद्ध करतात. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचा हा आदेश म्हणजे बनावट फेरफार आणि सत्तेच्या जोरावर केलेल्या प्रयत्नांना दिलेली कायदेशीर चपराक आहे. धार्मिक व सार्वजनिक मालमत्तेवर डोळा ठेवणाऱ्यांना हा स्पष्ट इशारा आहे.

- रामनाथ खोड
सामाजिक कार्यकर्ते

## शिवजयंतीनिमित्त महिला व मुलींची भव्य बाईक रॅली; स्त्रीशक्तीचा दणदणीत जागर

आष्टी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आष्टी शहरात महिला आणि मुलींची भव्य बाईक रॅली आयोजित करण्यात आली असून, स्त्रीशक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक एकात्मतेचा प्रभावी संदेश देण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे. सकाळी ९ वाजता किनारा चौकातून रॅलीची उत्साहात सुरुवात होणार आहे.

शिवमय वातावरणात रॅलीचा जल्लोष

रॅलीदरम्यान सहभागी महिला व मुली शिवकालीन वेशभूषा परिधान करून, भगवे झेंडे फडकवत आणि ''जय भवानी, जय शिवाजी'' च्या गजरात शहर दुमदुमवणार आहेत. ढोल-ताशांच्या निनादात आणि देशभक्तिपर घोषणांनी आष्टी शहरात शिवमय वातावरण निर्माण होणार आहे.

नियोजित मार्ग व अभिवादन कार्यक्रम

रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे राहणार आहे

किनारा चौक, आष्टी प्रारंभ

जळगाव छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास अभिवादन, कडा शिवाजी महाराज चौक अभिवादन, आष्टी मार्गे पुनरागमन

शिवाजी महाराज चौक अभिवादन

आंबेडकर चौक समारोप

प्रत्येक ठिकाणी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. महिला सशक्तीकरणाचा प्रभावी संदेश ही रॅली केवळ उत्सवापुरती मर्यादित नसून महिलांमधील आत्मविश्वास, स्वसंरक्षणाची जाणीव आणि समाजातील त्यांची नेतृत्व क्षमता अधोरेखित करण्याचा उद्देश आहे. ग्रामीण व शहरी भागातील तरुणींना सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभागाची प्रेरणा मिळावी, हा रॅलीमागील मुख्य हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

आयोजकांचा पुढाकार

रॅलीचे आयोजन ॲड. रुतुजा शिनपान फरतारे, अश्विनी घोडके आणि दिपाली काकडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, महिला मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि तरुण वर्ग या उपक्रमात सक्रिय सहकार्य करीत आहेत.

नागरिकांना सहभागाचे आवाहन

आष्टीतील सर्व नागरिकांनी रस्त्यांच्या कडेला उभे राहून सहभागी महिलांचे स्वागत करावे, वाहतुकीचे नियम पाळावेत आणि शिवजयंतीचा उत्सव शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

इतर शहरांतील यशस्वी आयोजनाची प्रेरणा

धाराशिव आणि संगमनेर येथे यापूर्वी आयोजित अशाच रॅलींना हजारोंच्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित राहिले होते. त्या यशस्वी उपक्रमांपासून प्रेरणा घेत आष्टीतही अधिक व्यापक व भव्य आयोजन करण्यात येत आहे.ही रॅली आष्टीतील महिलांच्या सामर्थ्याचे, परंपरेप्रती अभिमानाचे आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक ठरणार असून शिवजयंतीचा उत्सव नव्या ऊर्जेसह साजरा करण्यास निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

## दिंद्रुडमध्ये संत कंक्कय्या महाराज व संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

दिंद्रुड । प्रतिनिधी

वीरशैव कक्कय्या ढोर समाजाचे आराध्य दैवत, बसवशरण साहित्याचे रक्षण करणारे संत कक्कय्या महाराज आणि संत सेवालाल महाराज हे गोरराजवंशी बंजारा समाजातील प्रख्यात सतगुरू होते. सेवालाल महाराज हे एक भारतीय सामाजिक-धार्मिक क्षेत्रातील एक सुधारक होते. संत सेवालाल महाराज व संत कक्कय्या महाराजांच्या जयंतीनिमित्त काल रविवारी (दि१५) त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून या दोन्ही महान संतांची जयंती दिंद्रुड येथे उत्साहात साजरी करण्यात आली. गावचे जेष्ठ नागरिक ह. भ. प. बालासाहेब ठोंबरे महाराज, मा. पंचायत समिती सदस्य कैलास ठोंबरे, सिध्देश्वर मल्टिस्टेट चे अध्यक्ष युवराज ठोंबरे, चंद्रभागा मल्टिस्टेट चे अध्यक्ष अतुल ठोंबरे, शिवसेना उपतालुका प्रमुख नारायण चांदबोधले,



सरपंच भाऊसाहेब सुरवसे, माजी सरपंच अजय कोमटवार, माजी सरपंच नामदेव कटारे, जेष्ठ पत्रकार बंडू खांडेकर, प्रकाश काशीद, पत्रकार नागेश वकरे, गणेश काटकर, नितीन वाघमोडे, बाबासाहेब देशमाने, ग्रा.पं. सदस्य अतुल चव्हाण, रमेश शिंदे, मिलींद देशमाने, प्रा. संजय कटारे, युवा नेते बाळासाहेब ठोंबरे, दत्ता रेनगडे, डॉ. सोमेश्वर काटकर, नागेश कानडे, बळीराम चांदबोधले, दत्ता चांदबोधले, अमोल चांदबोधले, पप्पू चांदबोधले, कृष्णा सोनवणे, बप्पा चव्हाण, रंगनाथ साळुंके, बालासाहेब देशमाने, अशोक मुसळे, दिपक चांदबोधले, भाऊ जैन, भाऊ हंगरगे, साधू हवाले आदिंनी जयंतीदिनी अभिवादन केले. जयंतीचे आयोजन राम चांदबोधले टेलर यांनी केले. तर येथील जि. प. केंद्रीय शाळेत मुख्याध्यापक मंचकराव सोळंके, प्र. मुख्याध्यापक मनोहर कटारे, सहशिक्षक सिध्देश्वर बोकन, पांडुरंग वाकसे, विजय आडे, धनशेट्टी आदिंनी संत ककय्या महाराज व संत सेवालाल महाराज यांना जयंतीदिनी अभिवादन केले.

## ई शिवाई बस सवलतीस दिव्यांगाना नकार, प्रहार जनशक्ती पक्ष आंदोलन करणार

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस मध्ये दिव्यांगाना सवलत व आरक्षण असताना ई-शिवाई बस व स्लीपर कोच , शिवनेरी या बसमध्ये मात्र दिव्यांगाना सवलत देण्यास टाळाटाळ होत आहे, या बस मध्ये सर्वसामान्य प्रवाशांना जेष्ठ नागरिक सवलत,महिलांना ५० टक्के सूट,७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास अशा विविध प्रकारच्या सवलती दिल्या जात असताना दिव्यांगाना मात्र या सवलतींपासून वंचित ठेवण्यात आले आहे. दिव्यांगाना ही सवलत तात्काळ लागू करावी अन्यथा बच्चू कडु यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने आंदोलन करण्यात येईल अशी मागणी या संघटनेचे अध्यक्ष गोपाल पैंजणे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.



- केंद्र शासन व राज्य शासनाकडून दिव्यांग बांधवांना जास्तीत जास्त शासकीय सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे देशात व राज्यात खास करून दिव्यांग खाते निर्माण करण्यात आलेले आहे. या माध्यमातून दिव्यांगांना शासनाच्या सोयी, सवलती, मानधन देण्यात येते. राज्य शासनाच्या परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये दिव्यांग बांधवांना सवलत देण्याचा शासनाचा अधिनियम आहे. त्याप्रमाणे परिवहन महामंडळाच्या लालपरी, एशियाड, आराम,निमआराम,शिवशाही आदि बसेस मध्ये ७५ % सवलत आहे. त्याचप्रमाणे मागील एक-दीड वर्षांपूर्वी सुरू झालेल्या इलेक्ट्रिक बस मध्ये सुद्धा दिव्यांगांना सवलत आहे. मात्र स्लीपर कोच व मागील काही महिन्यापूर्वी सुरू झालेल्या ई शिवाई बसेस मध्ये महामंडळाने दिलेल्या सवलती नुसार महिला, वयोवृद्ध या सह अन्य नागरिकांना सवलत देण्यात येते मात्र मुद्दामहून दिव्यांगाना या बसेस मध्ये सवलत दिली गेलेली नाही.महामंडळात बसलेल्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दिव्यांगांवर अन्याय करण्याचा प्रकार घडवून आणलेला आहे, ही गंभीर बाब असून याची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेऊन संबंधित खो घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून स्लीपर कोच व ई-शिवाई, शिवनेरी व इतर सर्व बससेवेत तात्काळ सवलत लागू करण्याचे आदेश द्यावेत, दिव्यांगावरील हा अन्याय दूर न झाल्यास प्रहार जनशक्ती पक्ष राज्यात तीव्र आंदोलन करेल असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर पक्षाचे तालुकाध्यक्ष गोपाळ पैजने, भारत डोंगरे, विजय जोगडे ,नितीन कांबळे, अशोक अर्जुन ,लक्ष्मण गरड यांच्या सह्या आहेत.

## पान ६ वरुन...

### डॉ.विक्रांत विधाते यांची

विधाते यांनी ग्रड मेडिकल मुंबई येथील मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले.अंतीम वर्षात विशेष प्राविण्यासह यश मिळविले आहे.डा.विक्रांतचे प्राथमिक शिक्षण गंगुबाई आनंदराव धोंडे प्रार्थमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण आष्टी येथील पं.नेहरु विद्यालयात झाले.लातुर येथील शाहु महाविद्यालयात बारावीपर्यंत शिक्षण झाले.२०१८ मध्ये झालेल्या नीट परीक्षेत बीड व लातूर जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला होता. तसेच मराठवाडा विभागात विक्रांत द्वितीय आला होता.

### महाशिवरात्री निमित्त शिवभक्तांची

दरम्यान, विविध मंदिरांमध्ये केळीवाटप, खिचडी, अशा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, पिंपळेश्वर मंदिरामध्ये सकाळी ७वाजल्यापासून शिव भक्तांना दर्शनासाठी पिंपळेश्वर महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी गतवर्षी ५० हजार भक्तांनी घेतला दर्शनाला आलेल्या प्रत्येक भाविक भक्तांसाठी देवस्थान कमिटी व गावकऱ्यांच्या सहकाऱ्यांनी साडेसातशे क्विंटल साबुदाणा खिचडी चा महाप्रसाद करण्यात आला होता.मंदिर खुले करण्यात आले होते. कडा येथील नगर बीड महामार्गावरील महेश मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे महाशिवरात्रीनिमित्त ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भागवत कथा, श्रीराम कथा व शिवलीलामृत ग्रंथ पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. बीड सांगवी येथील महादेव दरा, मातावळी येथील भवरदरा, कडा महेश मंदीर, रुईनालकोल महेश्वर मंदीर, भवर दरा महादेव मंदिर, बेलगांव, सावता नगर आष्टी, क-हेवडगांव अशा तालुक्यातील गावांमध्ये ठिकठिकाणच्या महादेवाच्या मंदिरामध्ये सप्ताह, यात्रा, धार्मिक कार्यक्रमाने महाशिवरात्र साजरी झाली, पिंपळेश्वर मंदिर, रुईनालकोल, कडा मंदिराच्या परिसरात लहान मुलांचे खेळणीचे दुकान, मिठाईची दुकाने थाटली होती. भाविकांनी लांबच लांब रांगेत उभे राहून दर्शनाचा लाभघेतला शिव भक्तांनी अलोट गर्दी भगवान शंकराच्या दर्शनासाठी मंदिरामध्ये केली होती. भक्तांनी केलेल्या गर्दीने मंदिरांच्या परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. पोलिसांनी झालेल्या गर्दीचे अतिशय कौशल्यपूर्ण नियंत्रण करून प्रत्येक भाविकाला सहज दर्शन होण्यासाठी मंदिर परिसरात आपला बंदोबस्त चोख ठेवला होता. आष्टी तालुक्यात एकंदरीत मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला.

### महाशिवरात्री निमित्त

उत्सवाची सांगता भव्य शोभायात्रेने झाली. या शोभायात्रेत सुमारे अडीचशे वारकरी मुला-मुलींच्या टाळ-मृदंग भजनी मंडळ पथकाने सहभाग घेतला होता. 'हर हर महादेव'च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मराठवाडा भूषण लोकनेते सुरेश धस यांनी मंदिरात उपस्थित राहून पिंपळेश्वरांचे दर्शन घेतले व भाविकांशी संवाद साधला. महाशिवरात्रीनिमित्त आष्टी मुर्शदपूर परिसरासह तालुक्यातील लाखो भाविकांनी यावेळी दर्शनाचा लाभ घेतला. तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सवामुळे आष्टी शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

### आजपासून आरटीई

आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र घेतले असून हे प्रमाणपत्र नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर आरटीई प्रवेश टाळण्यासाठी अशा प्रकारे प्रमाणपत्र देणे चुकीचे असल्याचे मत मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे.या संदर्भात मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित शाळांना देण्यात आलेले अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.आरटीई प्रवेशासाठी काही पालकांकडून कागदपत्रांमध्ये अफरातफर झाल्याचे प्रकार यापूर्वी उघडकीस आले होते. त्यामुळे यंदा शिक्षण विभागाने अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे अनिवार्य केले आहे.

### माजलगावमध्ये जातीय शिवीगाळ

ही घटना १५ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता घडली असून १६ फेब्रुवारी रोजी पहाटे १२.३६ वाजता तोंडी फिर्याद नोंदविण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलमे १०९(१), ११५(२), ११८(१), १८९(२), १९१(२), ३५१(२), ३५२ तसेच ॲट्रॉसिटी कायद्यातील कलम ३(१)(), ३(१)(), ३(२)() अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

### ढेकणमोहा तांडा येथे

उपसरपंच, दयाराम पवार सरपंच, जेष्ठ सदस्य गोवर्धन पवार उपसरपंच बाजीराव पवार, भागवत खाकरे, अविनाश गवळी, नवनाथ धुमाळ, युवा नेते कैलास पवार, बाजीराव पवार, ,, नवनाथ आडे, देवीदास पवार, हरिभाऊ पवार, एकनाथ आडे, सुभाष आडे, रघुनाथ पवार, सुभाष पवार, शेषेराव पवार, नवनाथ नाथा पवार, धनु पवार, यादव पवार, सखुबाई पवार, मथुराबाई पवार, सुंदराबाई पवार, राधाबाई पवार, तुळसाबाई पवार, यशोदा पवार आदी मान्यवर व ग्रामस्थ, महीला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरने कलाक्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ख्यातनाम कलाकार घडविले -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर द्वारा सांस्कृतिक कला महोत्सव नुकताच दयानंद हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सांस्कृतिक कला मंचावर उद्घाटक म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.शिवाजीराव काळगे व उपाध्यक्ष डॉ.कल्याण बरमदे हे होते. यावेळी कला मंचावर लातूर आयएमएचे स्थानिक अध्यक्ष डॉ.अभय कदम, सचिव डॉ.ऋषिकेश हरिदास, महिला अध्यक्ष डॉ.ज्योती सुळ व महिला सचिव डॉ.प्रियंका डावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व नटराज मूर्ती पूजनाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी लातूर येथे आलो की छत्रपती शाहू कॉलेजची आठवण होते, दिवंगत लोकनेते विलासरावजी देशमुख साहेबांची आठवण होते, जगप्रसिद्ध अशा सिद्धेश्वर यात्रेची आठवण होते असे म्हणतं लातूरच्या या भूमीने शैक्षणिक क्षेत्रात तर गुणवत्ताधारक दिलेचं परंतु, सांस्कृतिक कलाक्षेत्रातही दिग्गज असे जगप्रसिद्ध कलाकार घडविले. त्यामुळे कलेचा हा समृद्ध वारसा लातूर मधील डॉक्टरांना कलेचा वारसा जन्मजात हक्काने मिळाला असल्याचे सांगत येथील डॉक्टरांच्या अंगी सांस्कृतिक कला ही वारसा हक्काने मिळाली असल्याचे नमूद केले. अनेक डॉक्टरांमध्ये विविध कलाकार लपलेले असतात कुणी गायक असतो, कुणी कवी असतो, कुणी लेखक असतो, कुणी उत्कृष्ट नृत्य करतो, कुणी उत्कृष्ट फोटोग्राफी करतो, कुणी उत्कृष्ट चित्र काढतो आणि या अशा डॉक्टरांमधील कलाकार समाजापुढे आणण्यासाठी लातूर आयएमएची शाखा सदोदित कार्यरत असते या गोष्टींचा सांस्कृतिक समितीचा



अध्यक्ष म्हणून मला नेहमीच कौतुक आणि गर्व वाटतो या शब्दांत लातूर आयएमएच्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचे डॉ.राजेश इंगोले यांनी कौतुक केले. पैसा हा कदाचित जीवन जगण्यासाठी मदत करतो. परंतु, जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी आणि जीवनामध्ये प्रमोद्च्य सुख समाधान मिळण्यासाठी एखादी कला प्रत्येक व्यक्तीच्या अंगात जिवंत असणे गरजेचे आहे. कारण, ती कला त्याला जीवन सुंदर पद्धतीने कसं जगायचं हे सतत शिकवत असते. त्यामुळे प्रत्येक डॉक्टरांनी आपल्या या दैनंदिन धकाधकीच्या आयुष्यात आपल्या अंगातील कलेला अंतर न देता त्या कलेचा उपयोग आपल्या जीवनातील ताण तणाव विसरण्यासाठी स्ट्रेस बस्टर म्हणून करावा असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी बोलताना खासदार शिवाजीराव काळगे यांनी महाराष्ट्रातील डॉक्टर्स कलाकार हे आपल्या प्रतिभेला वाव देत नाहीत. मात्र लातूर मधील डॉक्टर हे एका वेगळ्या धाटणीचे कलाकार असल्याने ते आपल्या कलेला वाव देतात आणि आपल्या छंदांना चांगल्या पद्धतीने जोपासतात. हे लातूरच्या डॉक्टरांचे आगळे वेगळेपण आहे या शब्दात डॉक्टर्स कलावंतांचा कौतुक केल. डॉक्टरांच्या विविध समस्या प्रश्न सोडविण्यासाठी खासदार म्हणून मी कटिबद्ध असल्याचे आश्वासन देत डॉक्टरांसाठी एक वेगळ्या प्रकारचा कला महोत्सव यापुढे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या सहकार्याने आपण आयोजित करून असे आश्वासन उपस्थित डॉक्टरांना दिले. आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ.अभय कदम यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर सातत्याने हा सांस्कृतिक कला महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून आयोजित करीत आहे. लातूर मधील सर्व डॉक्टर्स त्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देतात व आपल्या कला या सांस्कृतिक कला मंचावर सादर करतात त्यामुळे असे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आम्हाला प्रेरणा मिळते व हा कलेचा उत्सव यापुढेही असाच कायम ठेवणार असल्याचे सुतवाच केले. लातूर आयएमएच्या महिला अध्यक्ष डॉ.ज्योती सूळ यांनी लातूर आयएमए वुमन्स विंग्स व स्थानिक शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर मधील कलाकार डॉक्टर साठी हा सांस्कृतिक कला मंच मागील अनेक वर्षांपासून संघटनेने निर्माण करून दिला आहे. या कार्यक्रमांमध्ये सहभागी डॉक्टरची संख्या सातत्याने वाढत आहे आणि अनेक डॉक्टर्स या सांस्कृतिक कला उत्सवाची वाट पाहत असतात असे आवर्जून सांगितले. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समिती द्वारे घेतलेल्या राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविलेल्या डॉ.मोहिनी गानू, डॉ.अशोक गानू, डॉ.अशोक आरदवाड, डॉ.राजेश्री सावंत, डॉ.अमित उटीकर, डॉ.स्वप्ना उटीकर, डॉ.निलेश नागरगोजे यांचा समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.शिवाजी काळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बालाजी सुळ यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.ऋषिकेश हरिदास यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

# कर्ज पुनर्गठनाची प्रक्रिया ठप्प?

## शेतकऱ्यांना दिलासा की फक्त घोषणा, शेतकरी संभ्रमात

पुणे : अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्ज पुनर्गठन आणि कर्जवसुली स्थगितीचा मोठा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. बँकांकडून आवश्यक अहवाल सादर न झाल्यामुळे लाखो शेतकरी अजूनही प्रतीक्षेत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने सहकारी कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी संबंधित कर्ज वसुलीस एक वर्ष स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप रखडल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील बँकांनी यासंदर्भातील कार्यवाहीचे अहवाल जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) कार्यालयाकडे १२ फेब्रुवारीपर्यंत सादर केलेले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या पिकांचे, जमिनीचे तसेच पशुधन व घरांचे मोठे



नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या सहकार विभागामार्फत २६ नोव्हेंबर रोजी परिपत्रक जारी करून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्यासोबत शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्ह्यातील विविध बँकांना देण्यात आल्या होत्या. मात्र या संदर्भातील प्रत्यक्ष कार्यवाहीबाबतचे अहवाल अद्याप संबंधित विभागाकडे प्राप्त झालेले नाहीत.

जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) कार्यालयामार्फत २७ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील विविध बँकांना कर्ज पुनर्गठन आणि वसुली स्थगितीची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले होते. यामध्ये अग्रणी बँक, अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयीकृत, प्रादेशिक ग्रामीण आणि व्यापारी बँकांचा समावेश आहे. मात्र या बँकांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचे अहवाल अद्याप जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे प्राप्त झालेले नसल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. यंदाच्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तब्बल ३ लाख ५६ हजार २२९ शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्ज पुनर्गठन आणि वसुली स्थगितीचा निर्णय मोठा दिलासा ठरेल अशी अपेक्षा होती. मात्र, निर्णयाच्या अंमलबजावणीत होत असलेल्या विलंबामुळे शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीत आहेत. कर्जाची परतफेड, व्याजाचा ताण आणि नवीन हंगामासाठी लागणारे भांडवल या सर्व बाबींमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक दबाव वाढत आहे. शासनाने दिलेल्या सवलतींचा लाभ प्रत्यक्षात मिळेल का, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. प्रशासनाने बँकांकडून अहवाल मागवून प्रक्रिया गतीमान करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महापशुधन एक्स्पोमध्ये पुण्याच्या बाएफ संस्थेने दिली पशुपालक शेतकरी यांना नाविन्यपूर्ण माहिती




बीड/परळी । प्रतिनिधी


महापशुधन एक्स्पो परळी वैजनाथ येथे दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत नुकताच उत्साहात पार पडला. या तीन दिवसीय प्रदर्शनात संस्थेमार्फत स्टॉल लावण्यात आला होता. या स्टॉलला विविध अधिकारी, पशुपालक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती घेतली. स्टॉलमध्ये पशुपालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. आणि यांच्या संयुक्त विद्यमाने परळी केंद्रांतर्गत 'सॉर्टेड सिमेन' तंत्रज्ञानातून जन्मलेली वासरे प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना पशुसंवर्धन मंत्री मा. पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव माननीय सचिव डॉ. रामस्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे तसेच सहाय्यक आयुक्त शीतल कुमार मुकणे यांनी स्टॉलला भेट देऊन वासरांची पाहणी केली. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यक्रम व्यवस्थापक मा. मुकुल बाविस्कर आणि इतर अधिकारी उपस्थित होते. तसेच आणि यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पिक वाण जैवविविधता प्रकल्पाचेही प्रदर्शन मांडण्यात आले होते. स्थानिक पिक वाणांचे जतन व संवर्धन याबाबत सविस्तर माहिती स्टॉलवर देण्यात आली. या प्रदर्शनात आणि यांच्या पशुधन विकास कार्यक्रमांतर्गत 'सॉर्टेड सिमेन' तंत्रज्ञानातून जन्मलेल्या वासरांचा सहभाग नोंदविण्यात आला. एकूणच, या प्रदर्शनातून आधुनिक तंत्रज्ञान व जैवविविधतेच्या माध्यमातून पशुधन आणि शेती विकासाचा संदेश तीन दिवसात ४३५१ शेतकरी यांना देण्यात आल्याने प्रदर्शनात भेट दिलेल्या पशुपालक व शेतकरी यांना नावीन्यपूर्ण माहिती मिळाल्याने आनंदाचे वातावरण निर्माण होऊन बाएफ संस्थे सह कर्मचारी यांचे कौतुक करण्यात आले आहे

## असंतुलित खत धोरणामुळे देशाची माती संकटात
### ॲग्रो इनपुट डीलर्स असोसिएशन'ची सुधारणेसाठी पंतप्रधान मोदींना महत्त्वपूर्ण सूचना

नवी दिल्ली: देशातील सुमारे १४ कोटी शेतकरी कुटुंबे आणि कृषी क्षेत्राचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी 'ॲग्रो इनपुट डीलर्स असोसिएशन'ने केंद्र सरकारला खत अनुदान धोरणात आमूलाग्र बदल करण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मनमोहन कलंत्री यांनी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून विनंती केली आहे की, सध्याच्या खत धोरणामध्ये युरिया आणि च्या किमतींमधील वाढती तफावत कमी करणे अनिवार्य आहे.

मुख्य चिंता: युरियाचा अतिवापर आणि जमिनीचा पोत खालावणे श्री. कलंत्री यांनी नमूद केले की, सध्या युरिया (₹२६६/४५ किलो) आणि (₹२१००/५० किलो) यांच्या किमतीत मोठी तफावत आहे. यामुळे शेतकरी नाईलाजास्तव फक्त स्वस्त युरियाचा वापर करत आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या, नत्राच्या अतिवापरामुळे जमिनीची आम्लता वाढत आहे, ज्यामुळे जमीन कडक होत आहे आणि तिची पाणी शोषण्याची क्षमता कमी होत



आहे. हे भविष्यात देशाच्या अन्नसुरक्षेसाठी मोठे संकट ठरू शकते. असोसिएशनच्या प्रमुख सूचना: सल्फर कोटेड युरिया (युरिया गोल्ड): सामान्य युरिया ऐवजी सल्फर कोटेड युरियाला ₹५०० प्रति ४० किलो दराने प्रोत्साहन दिले जावे. हे 'स्लो रिलीज' खत असून जमिनीचा पोत खराब होण्याचे प्रमाण ३०% पर्यंत कमी करते. टप्प्याटप्प्याने उत्पादन: पुढील ५ वर्षांत सामान्य युरियाचे उत्पादन दरवर्षी २०% नी कमी करून त्याऐवजी प्रगत युरिया बाजारात आणला जावा. सब्सिडीचे फेरवाटप: युरियावर वाचलेल्या अतिरिक्त अनुदानाचा वापर आणि च्या किमती कमी (₹१३५०-₹१५००) करण्यासाठी केला जावा, जेणेकरून शेतकरी संतुलित पोषण पद्धतीचा अवलंब करू शकतील. चे निर्धारण: खत कंपन्यांकडून वेगवेगळ्या एमआरपी ठेवल्या जात असल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. सरकारने प्रत्येक ग्रेडची एमआरपी पुन्हा निश्चित करावी. पंतप्रधानांच्या संकल्पनेला समर्थन: पंतप्रधान मोदींनी गेल्या १० वर्षांत खरेदीवर खर्च केलेले १९.६० लाख कोटी रुपये आणि 'किसान सन्मान निधी' अंतर्गत ३.७० लाख कोटी रुपयांच्या थेट लाभाचे श्री. कलंत्री यांनी कौतुक केले. ते म्हणाले की, पंतप्रधानांचे "युरियाचा वापर कमी करण्याचे" स्वप्न तेव्हाच साकार होईल जेव्हा इतर खतांच्या किमती शेतकऱ्यांच्या आवाक्यात असतील. असोसिएशनने मागणी केली आहे की, पोटॅश च्या किमतींवरही नियंत्रण ठेवले जावे जेणेकरून ऊस आणि इतर पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होणार नाही. या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी असोसिएशनने पंतप्रधान आणि रसायने व खत मंत्री श्री. जे.पी. नड्डा यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितली आह

## बडीशेप लागवड तंत्रज्ञान

भारत प्राचीन काळापासून मसाल्यांच्या भूमीसाठी ओळखला जातो. मुख्य मसाला पिकांमध्ये जिरे, धणे, मेथी, बडीशेप इत्यादी प्रमुख आहेत. यापैकी एका जातीची बडीशेप हे भारतातील महत्त्वाचे मसाला पीक आहे. रब्बी आणि खरीप या दोन्ही हंगामात याची यशस्वीपणे लागवड करता येते, मात्र खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पीक निकामी होण्याची शक्यता असते. रब्बी हंगाम हा त्याच्या लागवडीसाठी सर्वोत्तम मानला जातो, कारण या हंगामात कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो आणि पावसामुळे पीक खराब होण्याचा धोका नसतो आणि खरीपाच्या तुलनेत उत्पादनही वाढते. बडीशेपमध्ये पाचक आणि दाहक विरोधी दोन्ही गुणधर्म असतात. त्यात पोटॅशियम, कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह तसेच इथेनॉल, लिमोझिन, फेकन इत्यादी वाष्पशील तेल घटक असतात. याशिवाय बडीशेपमध्ये वेदनाशामक, दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म देखील असतात.

हवामान : बडीशेपच्या चांगल्या उत्पादनासाठी कोरडे आणि थंड हवामान उत्तम आहे. बियांच्या उगवणासाठी योग्य तापमान २०-२९ अंश सेंटीग्रेड आणि पिकाच्या चांगल्या वाढीसाठी १५-२० अंश सेंटीग्रेड तापमान योग्य आहे.

जमीन : बडीशेप लागवडीसाठी , वालुकामय जमीन वगळता, इतर सर्व प्रकारची जमीन ज्यामध्ये सेंद्रिय पदार्थ पुरेशा प्रमाणात आणि मातीचा आहे. ६.६ ते ८.० आहे. तिथे अबडीशेपचे पीक चांगले येते.

जमीन तयार करणे : जमीन तयार करण्यासाठी प्रथम एक किंवा दोन नांगरणी माती फिरवून नांगरणी करावी. यानंतर माती भुसभुशीत करून शेत सपाट केल्यानंतर सोयीनुसार बेड तयार करावेत.



सुधारित जाती : आरएफ -१०५, आरएफ-१२५, पीएफ-३५, गुजरात सौन्फ-१, गुजरात सौन्फ-२, गुजरात सौन्फ-११, सिओ-११, हिसार स्वरूप.

पेरणीची वेळ : बडीशेप हे दीर्घ कालावधीचे पीक आहे, त्यामुळे रब्बी हंगामाच्या सुरुवातीला पेरणी केल्यास अधिक उत्पादन घेता येते. एका जातीची बडीशेप थेट शेतात किंवा रोपवाटिकेत रोपे तयार करून लागवड करता येते.ऑक्टोबरचा पहिला आठवडा पेरणीसाठी उत्तम आहे. रोपवाटिकेमध्ये जुलै-ऑगस्ट महिन्यात पेरणी केली जाते आणि ४५-६० दिवसांनी लागवड केली जाते.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी, बियाण्यांवर बुरशीनाशक बाविस्टिन (दर २ ग्रॅम प्रति किलो बियाणे) किंवा सेंद्रिय बुरशीनाशक ट्रायकोडर्मा (८-१० ग्रॅम प्रति किलो बियाणे) सह प्रक्रिया करून पेरणी करा.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : बडीसोपच्या अधिक आणि चांगल्या उत्पादनांसाठी हेक्टरी १५ ते २० टन सेंद्रिय खाते लागवडीपूर्वी शेवटच्या वखराच्या पाळीसोबत जमिनीत मिसळून द्यावी तसेच रासायनिक खतानासुद्धा बडीसोप हे पिक अधिक चांगला प्रतिसाद देते असे सिद्ध झाले आहे. हेक्टरी ९० किलो ग्रॅम नत्र ४० किलो ग्रॅम स्फुरद आणि जमिनीच्या आवश्यकतेनुसार पालाश यांची मात्रा विभागून पिकाला दिल्यास उत्पादनावर अतिशय चांगला परिणाम दिसून येतो. नत्रयुक्त खतांची अर्धी व स्फुरदयुक्त खताची पूर्ण मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी आणि उरलेली नत्राची आर्धी मात्र लागवडीपासून ६० दिवसांनी पिकला द्यावी.

पाणी व्यवस्थापन : बडीसोपला पाणी व्यवस्थापन काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. लागवडीच्या वेळेस जर जमिनीत ओलावा कमी असेल तर हलके ओलीत करावे. यानंतर जमिनीचा मगदूर आणि वातावरण लक्षात घेऊन १०-१२ दिवसांच्या अंतराने पिकाला पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

किड व रोग व्यवस्थापन : बडीसोपवर मोठ्या प्रमाणावर कीड किवा रोगाचे अतिक्रमण होत नाही. परंतु दमट हवामान व अतिशय थंडी यामुळे मावा या किडीचा पिकावर उपद्रव होऊ शकतो. या किडीच्या नियंत्रणाकरिता डायमेथोएट ३५ टक्के प्रवाही १० मी.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारावे. तसेच थंडीच्या कालावधीत दहिया या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २० टक्के तीव्रतेची २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारावी.

काढणी व्यवस्थापन : बडीसोपच्या दाण्याच्या आकारावरून त्याची चव ठरत असते. साधारणपणे पूर्ण परिपक्व दाण्याच्या आकाराच्या निम्म्या आकाराची बडीसोप चवीला गोड व स्वादिष्ट असते. त्यामुळे अशा प्रकारची बडीसोप काढणीस, फुले येणाऱ्या दिवसापासून ३०-४० दिवसांनतर तयार होते. यावेळी पिक पिवळे होण्यास सुरुवात होते. अशा वेळेस उपरोक्त अवस्थेतील फांद्या, त्यावरील अंबेल काढून त्यांना सावलीत बांदल बांधून सुकवतात. चांगल्या प्रतीची बडीसोप उत्पादनाकरीता परीपक्वतेच्या आधारावर पिकाचे ५-६ तोडे घेणे गरजेचे असते.

उत्पन्न : साधारणपणे वरीलप्रमाणे शास्त्रीय पद्धतीचा वापर करून बडीसोपची जिरायती शेती केल्यास हेक्टरी १५-१७ क्विंटल उत्पन्न मिळू शकते. लखनवी बडीसोपचे म्हणजे स्वादिष्ट आणि गोड चवीच्या बडीसोपचे प्रती हेक्टरी ५-७.५ क्विंटल एवढे उत्पादन मिळू शकते.




### जागतिक दिवस
### जागतिक धर्म दिन

### महत्वाच्या घटना

१६०१ : आजच्या दिवशीमुघल सम्राट अकबरने असीरगढ येथे असलेल्या किल्ल्यात प्रवेश केला.
१७७३ : कॅप्टन जेम्स कुक यांनी अंटार्क्टिक वृत्त पार केले.
१८७४ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा मृत्यू. (जन्म:११ मे १८११)
१९१२ : रॉबर्ट फाल्कन स्कॉट दक्षिण ध्रुवावर पोहचले.
१९४१ : नेताजी सुभाष चंद्र बोस ह्यांचे जर्मनी ला प्रयाण
१९४५ : दुसरे महायुद्ध - रशियन फौजांनी पोलंडमधील वॉर्सा शहर उद्ध्वस्त केले.
१९४५ : भारतीय चित्रपटाचे गीतकार आणि स्क्रिप्ट लेखक जावेद अख्तर यांचा जन्म.
१९४६ : संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची पहिली बैठक झाली.
१९५६ : बेळगाव, कारवार आणि बिदर या जिल्ह्यांतील मराठी भाग त्या वेळच्या म्हैसूर राज्यास जोडण्याची घोषणा
१९८५ : इंग्लंड विरुद्ध माजी भारतीय कर्णधार मो.अझरूद्दीन यांनी दुसरे टेस्ट अर्धशतक मारले.
१९८९ : जे. के. बजाज हे उत्तरी ध्रुवावर जाणारे पहिले भारतीय ठरले.
२००१ : अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील 'सूर्या पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांना जाहीर.
२००१ : कथ्थक नृत्यांगना डॉ. रोहिणी भाटे यांना मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान जाहीर.
२००७ : ऑस्ट्रेलिया चे प्रसिद्ध क्रिकेटर माइकल बेवन यांनी आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.
२००९ : भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस रणधीर सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७१ : भारताचे महान सम्राट कृष्णदेवराय यांचा जन्म.
१७०६ : बेंजामिन फ्रँकलिन - अमेरिकन संशोधक आणि मुत्सद्दी (मृत्यू:१७ एप्रिल १७९०)
१८८८ : प्रसिद्ध हिंदी साहित्यिक बाबु गुलाबराय यांचा जन्म.
१८९५ : विठ्ठल दत्तात्रय तथा वि. द. घाटे - लेखक व शिक्षणतज्ज्ञ, रविकिरण मंडळातील एक कवी (मृत्यू:३ मे१९७८)
१९०५ : दत्तात्रय रामचंद्र कापरेकर - गणितज्ञ (मृत्यू: १९८६)
१९०६ : शकुंतला परांजपे - कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात अनन्यसाधारण कार्य केलेल्या समाजसेविका (मृत्यू: ३ मे२०००)
१९०८ : अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ 'एल. व्ही. प्रसाद' - चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २२ जून १९९४)
१९१७ : एम. जी. रामचंद्रन - अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (मृत्यू:२४ डिसेंबर १९८७)
१९१८ : सईद अमीर हैदर कमाल नक्वी ऊर्फ 'कमाल अमरोही' - चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, संवादलेखक, पटकथाकार व कवी (मृत्यू:११ फेब्रुवारी १९९३)
१९१८ : रुसी मोदी - टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पद्मभूषण (१९८९) (मृत्यू:१६ मे२०१४)
१९३२ : मधुकर केचे - साहित्यिक (मृत्यू: २५ मार्च१९९३)
१९४२ : मुहम्मद अली ऊर्फ कॅशिअस क्ले - अमेरिकन मुष्टियोद्धा. अमेरिकन वर्णभेदाचा निषेध म्हणून त्याने धर्मांतर करुन मुहम्मद अली हे नाव स्वीकारले.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५६ : हुमायून दुसरा मुघल सम्राट (जन्म: ७ मार्च १५०८)
१७७१ : गोपाळराव पटवर्धन पेशव्यांचे सरदार (जन्म: )
१८९३ : रुदरफोर्ड हेस अमेरिकेचे १९ वा राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ आक्टोबर १८२२)
१९३० : अँजेलिना येओवार्ड ऊर्फ 'गौहर जान' गायिका व नर्तिका (जन्म: २६ जून १८७३)
१९५१ : प्रसिद्ध साहित्यकार ज्योति प्रसाद अग्रवाल यांचे निधन
१९६१ : पॅट्रिक लुमूंबा काँगोचे पहिले पंतप्रधान (जन्म: २ जुलै १९२५)
१९७१ : बॅ. नाथ पै स्वातंत्र्य सैनिक व घटनातज्ज्ञ (२५ सप्टेंबर १९२२)
१९८८ : लीला मिश्रा अभिनेत्री (जन्म: ? ? १९०८)
१९९५ : डॉ. व्ही. टी. पाटील ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक
२००० : सुरेश हळदणकर गायक आणि अभिनेते
२००५ : चीनचे राष्ट्राध्यक्ष झाओ झियांग यांचे निधन.
२००८ : रॉबर्ट जेम्स तथा 'बॉबी' फिशर अमेरिकन बुद्धिबळपटू व ग्रँडमास्टर (जन्म: ९ मार्च १९४३)
२०१० : ज्योति बसू प. बंगालचे मुख्यमंत्री (जन्म: ८ जुलै १९१४)
२०१३ : ज्योत्स्ना देवधर मराठी व हिन्दी लेखिका आणि आकाशवाणी निर्मात्या (जन्म: २७ फेब्रुवारी १९२६)
२०१४ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट भिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (जन्म: ६ एप्रिल १९३१ पाबना, पाबना, बांगला देश)
२०१४ : ला भारतीय उद्योजक सुनंदा पुष्कर यांचे निधन.

cmyk

मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

# नवनिर्वाचित सदस्यांचे पुणे येथे प्रशिक्षण संपन्न

## आयुक्त आशिमा मित्तल यांच्या पुढाकाराने सदस्यांना मिळाले कामकाजाचे धडे

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेची पहिलीच सार्वत्रिक निवडणूक (२०२५-२६) नुकतीच पार पडली आहे. प्रथमच अस्तित्वात आलेल्या या महापालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांना महापालिका कामकाजाचा अनुभव व तांत्रिक माहिती मिळावी, या उद्देशाने जिल्हाधिकारी तथा आयुक्त जालना शहर महानगरपालिका श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे दोन दिवसीय 'पायाभूत प्रशिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस पार पडलेल्या या प्रशिक्षणात ४९ नवनिर्वाचित सदस्य सहभागी झाले होते.

प्रशिक्षणाचा पहिला दिवस: धोरणात्मक ओळख आणि शाश्वत विकास प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी सदस्यांची नावनोंदणी आणि उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी सदस्यांना यशदामधील उपक्रम आणि दोन दिवसीय प्रशिक्षणामागचा मुख्य उद्देश समजावून सांगण्यात आला.

पहिल्या दिवशी खालील विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले: लोकप्रतिनिधी व प्रशासन समन्वय: लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी एकत्रितपणे काम कसे करावे, याचे प्रशिक्षण देण्यात आले. कचरा व्यवस्थापन: पुणे महानगरपालिकेच्या 'स्वच्छ' मॉडेलच्या धर्तीवर घनकचरा व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली. तंत्रज्ञानाचा वापर: महापालिका कामकाजात माहिती व तंत्रज्ञान आणून पारदर्शकता कशी वाढवता येईल, यावर



भर देण्यात आला. पर्यावरण व व्यक्तिमत्व विकास: शाश्वत विकास, हरित शहरे आणि एक 'यशस्वी लोकप्रतिनिधी' होण्यासाठी आवश्यक कौशल्ये व 'मनाची अमर्याद शक्ती' या विषयांवर सत्रे घेण्यात आली. प्रशिक्षणाचा दुसरा दिवस: अधिनियम आणि तांत्रिक कामकाज दुसऱ्या दिवशी महापालिकेच्या प्रत्यक्ष कामकाजातील तांत्रिक आणि कायदेशीर बाबींवर प्रकाश टाकण्यात आला: महानगरपालिका अधिनियम: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, सभा शास्त्र आणि स्थायी समितीच्या कामकाजाची सखोल माहिती देण्यात आली. नगररचना व प्रकल्प: भवन रचना, बांधकाम विभाग, प्रकल्प व्यवस्थापन आणि मालमत्ता व्यवस्थापन विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. महसूल व पाणीपुरवठा: महापालिकेची कर आकारणी, कर संकलन आणि पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रशिक्षण दिले गेले. पथविक्रेता धोरण: पथविक्रेता अधिनियम २०१४ आणि महाराष्ट्र पथविक्रेता योजना २०१७ अंतर्गत शहर फेरीवाला समितीच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या. समारोप व प्रमाणपत्र वाटप प्रशिक्षण कार्यक्रमाच्या शेवटी सर्व प्रशिक्षणार्थी सदस्यांचे मूल्यमापन करण्यात आले आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यात आले. यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल सदस्यांना प्रमाणपत्र वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी जालना शहर महानगरपालिकेच्या सचिव तथा सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण आणि केशव कानपुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणामुळे जालना शहराच्या विकासाला गती मिळेल आणि नवनिर्वाचित सदस्यांना आपल्या प्रभागातील प्रश्न कायदेशीर चौकटीत राहून सोडवण्यास मदत होईल.

# अहिल्यानगरच्या मुकुंदनगरमध्ये दहशतवाद विरोधी पथकाचे छापे, अनेकांची चौकशी

## अहिल्यागरच्या मुकुंदनगमध्ये छापे, तलवारी जप्त

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्याच्या दहशतवाद विरोधी पथकाकडून अहिल्यानगरमधील मुकुंदनगरसह राज्याच्या विविध जिल्ह्यांत २१ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहे., काल रात्रीपासून ही छापेमारी सुरू असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेले नाही. मुकुंदनगरमध्ये सात ठिकाणी पोलिसांनी छापे टाकून चौकशी केली आहे. यासंबंधी एटीएसने माहिती दिली की, १४ फेब्रुवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान, महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने वॉरंटच्या आधारे अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण १२ ठिकाणी छापे टाकले. याव्यतिरिक्त, यवतमाळ जिल्ह्यात, पुसद आणि उमरखेडमध्ये १४ संशयितांची सखोल चौकशी सुरू आहे. अहिल्यानगरमधील कारवाईदरम्यान, तलवारी जप्त करण्यात आल्या. कारवाईचा भाग म्हणून आक्षेपार्ह कागदपत्रे, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि सीसीटीव्ही उपकरणे देखील तपासली जात आहेत.या कारवाईत आतापर्यंत कोणालाही अटक झालेली नाही आणि संशयितांची सविस्तर चौकशी सुरू आहे.

याशिवाय यवतमाळमध्ये पुसद आणि अकोला उमरखेडमध्येही छापे घालण्यात आले आहेत. एकाचवेळी ही पथके ठिकठिकाणी पाठविण्यात आलेली आहेत. एटीएसला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई सुरू असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आली नाही. मात्र, आतापर्यत अनेक घरांत जाऊन पोलिसांनी चौकशी केली आहे. स्थानिक पोलिसांच्या बंदोबस्तात ही कारवाई सुरू आहे. दुसरीकडे यवतमाळ जिल्ह्यात एटीएसची २० पथक दाखल झाले आहेत. एटीएसकडून उमरखेड, पुसदमध्ये संशयितांची कसून चौकशी करण्यात येत आहे. या कारवाईत वरिष्ठ आयपीएस अधिकारी ही सहभागी झाले आहेत. राज्यात एटीएएसने रात्रभर गोपनीय कारवाई केली. उमरखेड आणि पुसदमध्ये एटीएसचे २० पथक तळ ठोकून आहेत. रात्री त्यांनी अनेकांची चौकशी केली. तर काही तरुणांना, संशयितांना ताब्यात घेतले आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात रात्रभर कारवाई करण्यात आली. ही कारवाई अत्यंत गोपनिय पद्धतीने करण्यात आली. रात्री अनेकांची चौकशी करण्यात आली.

# महानगरपालिकेत व्यापारी प्रतिनिधी म्हणून सतीश पंच यांची वर्णी लावावी

## मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब यांची मागणी

जालना। प्रतिनिधी

जालना शहराच्या विकासात व्यापाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. हे शहर व्यापारी आणि उद्योजकांचे शहर म्हणून ओळखले जाते. या पार्श्वभूमीवर, नवनिर्वाचित जालना महानगरपालिकेत व्यापाऱ्यांच्या समस्या मांडण्यासाठी आणि शहराच्या आर्थिक नाडीला गती देण्यासाठी सक्षम व्यापारी चेहरा असणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा 'कॅट'चे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांची महानगरपालिकेत स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी 'कॅट'चे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी केली आहे. या संदर्भात हस्तीमल बंब यांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन दिले आहे.

व्यापाऱ्यांचा बुलंद आवाज आवश्यक : प्रसिद्धीपत्रकात हस्तीमल बंब यांनी म्हटले आहे की, जालना हे व्यापारी शहर आहे आणि व्यापाऱ्यांनीच या शहराचे नाव मोठे केले आहे. वारंवार मागणी करूनही अद्याप व्यापाऱ्यांसाठी मतदार संघ अस्तित्वात आणण्याची मागणी पूर्ण झालेली नाही. अशा परिस्थितीत, किमान महानगरपालिकेत तरी व्यापाऱ्यांचा हक्काचा प्रतिनिधी असणे गरजेचे आहे. सतीश पंच हे अत्यंत अनुभवी असून त्यांनी अनेक संघटनात्मक पदे भूषवली आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे व्यापाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडले जातील.पक्षाशी बांधीलकी आणि राष्ट्रीय नेतृत्वाचा पाठिंबा : सतीश पंच यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश करवून घेण्यात आलेला असून, व्यापारी वर्ग नेहमीच भाजपच्या पाठीशी उभा राहिला आहे. मुंबई येथे झालेल्या 'कॅट'च्या मोठ्या बैठकीत राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार प्रवीण खंडेलवाल यांनी देखील रावसाहेब दानवे पाटील यांच्याशी संवाद साधून व्यापारी प्रतिनिधीला राजकारणात आणि निर्णय प्रक्रियेत स्थान देण्याचे सुतोवाच केले आहे. हा वरून आलेला आदेश आणि व्यापाऱ्यांची भावना लक्षात घेता सतीश पंच यांच्यासारखा अनुभवी चेहरा महानगरपालिकेत जाणे शहराच्या दृष्टीने हिताचे ठरेल, असा विश्वास बंब यांनी व्यक्त केला आहे. शहरातील सर्व व्यापारी वर्गातून या मागणीला मोठा पाठिंबा मिळत असून, सतीश पंच यांची नियुक्ती झाल्यास जालना शहराच्या व्यापारी आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

# गंगाखेडला डीजे मुक्त होणार शिवजन्मोत्सव

परभणी । प्रतिनिधी

गंगाखेडे येथे यंदाचा शिवजन्मोत्सव विविध सामाजिक उपक्रमांसह पारंपरिक पध्दतीने साजरा करण्यात येणार असून, यावर्षी प्रथमच डीजे व ढोल-ताशांच्या गजराऐवजी भजन, टाळ मृदंगाच्या निनादात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराणा प्रताप चौक शिवजन्मोत्सव कमिटी, शिवजन्मोत्सव कमिटी गोदाकाठ आणि राजा शिवछत्रपती सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी मिरवणूक काढून शिवजन्मोत्सव साजरा केला जात होता. गतवर्षी शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात आला असून, त्याचे सुशोभीकरण पुढील काळात करण्यात येणार आहे. यंदाच्या उत्सवात कुठलाही डीजे अथवा ढोलपथक न ठेवता, पारंपरिक वारकरी संप्रदायाच्या पध्दतीने पालखी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेण्यात आला. दि.१७ व १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# चाकूर पंचायत समिती लिपिकांचे असहकार आंदोलन

## २३ फेब्रुवारीपासून बेमुदत कामबंदचा इशारा

लातूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील लिपिक संवर्गाच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी चाकूर येथील पंचायत समितीतील लिपिकांनी सोमवारपासून (दि. १६) असहकार आंदोलनास सुरुवात केली आहे. चाकूर तालुक्यातील एकूण २१ लिपिक कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

लिपिक संवर्ग हा प्रशासनाचा कणा मानला जातो. चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतनश्रेणी लागू करावी, पदोन्नती स्तर कमी करून पदनामात बदल करावा, जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करावी, तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षायादीत असलेल्या सर्वांना न्याय द्यावा, या प्रमुख



मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात दि. १६ ते १७ फेब्रुवारी २०२६ कार्यालयात उपस्थित राहून स्वाक्षरी करणे व काळी फीत लावून निषेध नोंदवणे, १८ फेब्रुवारी २०२६ कार्यालयात उपस्थिती लावून कार्यालयासमोर शांततापूर्ण मार्गाने घोषणाबाजी करणे, २० फेब्रुवारी २०२६ शासनाला दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा करणे, दि. २३ फेब्रुवारी २०२६ पासून मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संपूर्ण कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. लिपिक बांधवांनी हे आंदोलन सनदशीर मार्गाने करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या असहकार आंदोलनात अध्यक्ष संग्राम भुरे,उपाध्यक्ष संतोष मुदमे,सचिव अतुल गायकवाड,सहसचिव सदाशिव भिसे,मार्गदर्शक व्यंकटराव घोडके, माधव वागलगावे,गिरीधर तिकटे, मंगेश बिराजदार,राजेंद्र नरवाडे,भागवत गडदे,अमोल कराड,ए एच कल्याणे,ए एस भणगे आदी कर्मचारी सहभागी होते. या आंदोलनामुळे पंचायत समितीच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रशासन आणि शासन यामध्ये समन्वय साधून लवकरात लवकर तोडगा निघेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जालना शहरात प्रथमच प्री-मॅच्युअर मृत बाळाचे देहदान

## दु:खातूनही दहीभाते कुटुंबाचा समाजापुढे आदर्श

जालना

शहरात प्रथमच प्री-मॅच्युअर मृत बाळाचे वैद्यकीय शिक्षणासाठी देहदान करण्यात आल्याची स्तुत्य घटना घडली आहे. सोनाली उदय दहीभाते यांना दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्री-मॅच्युअर बाळाचा जन्म झाला होता. जन्मानंतर प्रकृती अत्यंत नाजूक असल्याने बाळाला संजिवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथील विभागात दाखल करण्यात आले होते.

डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही बाळाला वाचविण्यात अपयश आले. या दु:खद प्रसंगातही बाळाचे वडील डॉ. उदय दहीभाते यांनी समाजापुढे आदर्श ठेवत मृत बाळाचे देहदान करण्याचा निर्णय घेतला. वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी बाळाचा देह जालना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे सुपूर्द करण्यात आला. हा निर्णय डॉ. बाळीराम बागल, डॉ. कैलाश राजगुरू व डॉ. शिवदास मिरकड व डॉ सहिदा अफरोज, डॉ प्रतिमा कुलकर्णी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या स्तुत्य उपक्रमामुळे वैद्यकीय शिक्षणाला मोठी मदत होणार असून देहदानाबाबत समाजात जनजागृती होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे. जालना शहरात घडलेल्या या घटनेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती,व समाजासाठी जगण्याची प्रेरणा भागवत कथांमधून मिळते-आ. लोणीकर

जालना। प्रतिनिधी

भागवत कथा ही केवळ पौराणिक कथा नसून जीवनाला योग्य दिशा देणारा अमृतग्रंथ आहे. धर्म, भक्ती, कर्म व प्रेम यांचा सुंदर संगम म्हणजे भागवत होय. या पावन कथेमुळे मन शुद्ध होते, विचार पवित्र होतात व आत्मा परमात्म्याच्या जवळ पोहोचतो. भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य लीलांमधून भक्तांना सत्य, करुणा, क्षमा, समर्पण व निःस्वार्थ प्रेमाचे दर्शन घडते. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती, भक्तीतील निष्ठा व समाजासाठी जगण्याची प्रेरणा या कथांमधून मिळते. आजच्या धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनात भागवत कथा आत्मशांती, संयम व सद्बुद्धी देणारी ठरते असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले. मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी येथे आयोजित भागवत कथा सप्ताह व सेवालाल महाराज जयंती निमित्त भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रम अत्यंत भक्तिभाव, श्रद्धा व उत्साहात संपन्न झाला. संपूर्ण परिसर ''हरि नाम'' व ''हर हर महादेव'' यांच्या गजराने भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. भागवत कथावाचन



व कीर्तनाद्वारे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती देण्यात आली. याच पवित्र दिवशी बंजारा समाजाचे महान संत, समाजसुधारक व आध्यात्मिक मार्गदर्शक सेवालाल महाराज यांची जयंतीही भक्तिभावाने साजरी करण्यात आली. आमदार बबनराव लोणीकर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून नमन केले.

सेवालाल महाराजांनी समाजाला अंधश्रद्धा व व्यसनांपासून मुक्त होण्याचा संदेश दिला. त्यांनी शिक्षण, स्वाभिमान, श्रम व एकतेचा मार्ग दाखवून समाजाला सन्मानाचे जीवन जगण्याची प्रेरणा दिली. त्यांचे संपूर्ण आयुष्य त्याग, सेवा व साधनेचे मूर्तिमंत उदाहरण होते. वक्त्यांनी सांगितले की, भागवत कथेतून जसा धर्म, भक्ती व मानवतेचा संदेश मिळतो, तसाच संदेश सेवालाल महाराजांनी आपल्या जीवनातून दिला. सेवालाल महाराजांचे विचार व भागवत कथेतून मिळालेली प्रेरणा आचरणात आणली तर समाज निश्चितच आध्यात्मिक, सुसंस्कृत व प्रगत बनेल. माणसाच्या अंतःकरणातील अज्ञान, अहंकार व दुष्ट प्रवृत्ती दूर करून त्याला सुसंस्कृत व सद्गुणी बनवणे हे अंतिम ध्येय एकच होते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. आजच्या तरुण पिढीसाठी मोबाईलचे अतिरेकी व्यसन, दारू, तंबाखू व चुकीची संगत यापासून दूर राहण्याचे आवाहन केले. सेवालाल महाराजांसारखा स्वाभिमान, परिश्रम, प्रामाणिकपणा व सेवा वृत्ती अंगीकारून भागवत कथेतून मिळणारे संस्कार जीवनात उतरवावेत, भागवत आपल्याला आत्मशांती देते आणि सेवालाल महाराज आपल्याला जीवनदिशा देतात; या दोघांच्या विचारांनी आपण आदर्श समाज घडवू शकतो. एकता, शिक्षण व संस्कार हेच समाजाचे खरे आधारस्तंभ असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. महाशिवरात्री निमित्त श्रीमद्? भागवत कथा सप्ताह आंतरराष्ट्रीय कथाकार मदन मोहन शास्त्रीजी, कथेचे आयोजक श्री महंत स्वामी विश्वेश्वरानंद जी महाराज, बिडी पवार रायमुले राजेश रायमुले, दिलीपराव सावंत पद्माकर सावंत यांच्यासह या भक्तिमय सोहळ्याला नागरिक, भाविक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंब तालुक्यात अफूची बेकायदेशीर लागवड; साडेचार किलो पीक जप्त

धाराशिव । प्रतिनिधी

कळंब तालुक्यातील पानगाव शिवारात अफूची अवैध लागवड केल्याचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला आहे. येरमाळा पोलीस ठाणे यांच्या पथकाने छापा टाकून सुमारे साडेचार किलो वजनाचे अफूचे पीक जप्त केले. जप्त मालाची अंदाजे बाजार किंमत १ लाख ४१ हजार १५० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यापूर्वी वाशी तालुक्यातील दसमेगाव तसेच कळंब तालुक्यातील कनेरवाडी येथेही अशाच प्रकारच्या घटना उघड झाल्यानंतर तालुक्यात अवैध अंमली पदार्थांच्या लागवडीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याच अनुषंगाने येरमाळा परिसरालगत असलेल्या पानगाव शिवारातील गट क्रमांक १४१/४ मधील शेतात अफूची शेती सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि तात्याराव भालेराव व त्यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी भेट देत तपासणी केली. पाहणीदरम्यान पानगाव येथील बाबासाहेब वाघमारे यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात अफूची झाडे आढळून आली. घटनास्थळी



पंचनामा करून संपूर्ण कारवाईची व्हिडिओग्राफी करण्यात आली. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अफूचे पीक जप्त करण्यात आले आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून पुढील तपास येरमाळा पोलीस करत आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर लागवड करू नये; अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे, उपनिरीक्षक आवारे, तानाजी काळे, कॉन्स्टेबल किरण शिंदे, रवींद्र कांबळे, निलेश जाधव आदी कर्मचारी उपस्थित होते.

cmyk

# ऐतिहासिक मंदिरांकडे जाणारा रस्ता कचऱ्याने अडवला

## भाविकांमध्ये संताप; लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाला धार्मिक स्थळांचा विटाळ झालाय का?

बीड । प्रतिनिधी

**बीड शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेल्या श्री खंडोबा दिपमाळ मंदिर व खंडेश्वरी देवी मंदिर येथे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर शहरातील तब्बल पन्नास गल्यांचा कचरा टाकून थेट डम्पिंग ग्राउंड तयार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे मंदिराकडे जाणारा मुख्य मार्ग पूर्णतः बंद झाला असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.**

शेकडो वर्षांचा धार्मिक व सांस्कृतिक इतिहास असलेल्या या दोन्ही मंदिरांकडे जाणाऱ्या रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. डासांचा प्रादुर्भाव, अस्वच्छता तसेच मोकाट जनावरांची वर्दळ वाढल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याला थेट धोका निर्माण झाला आहे. परिणामी नागरिक व भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या संदर्भात संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब अनेक वेळा आणूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप भाविक व स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. धार्मिक व ऐतिहासिक वारसा असलेल्या स्थळांकडे जाणारा मुख्य रस्ता कचऱ्याने अडवला जाणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक असून, शहराच्या सांस्कृतिक वारशाची



अवहेलना असल्याची भावना व्यक्त होत आहे. धार्मिक व ऐतिहासिक स्थळांकडे जाणारा रस्ता कचऱ्याने अडवला जाणे हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा गंभीर प्रकार आहे लोकप्रतिनिधी अणि जिल्हा प्रशासनाने धार्मिक स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील बेकायदेशीररित्या नगर पालिकेने सुरु केलेलं कचऱ्याचं डम्पिंग ग्राउंड तात्काळ हटवून रस्ता मोकळा करावा तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाविक व नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

बीड शहराचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा असलेल्या श्री खंडोबा दिपमाळ मंदिर आणि खंडेश्वरी देवी मंदिर येथे जाणारा मुख्य रस्ता कचऱ्याने अडवला जाणे हा केवळ स्वच्छतेचा प्रश्न नसून प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. निवडणुकीत धर्म आठवणारे लोकप्रतिनिधी आज भाविकांच्या श्रद्धा आणि आरोग्याच्या प्रश्नावर गप्प बसलेले दिसतात. धार्मिक स्थळांच्या दारात कचऱ्याचे ढीग साचणे म्हणजे श्रद्धेचा आणि शहराच्या वारशाचा अपमान आहे. तात्काळ कारवाई झाली नाही तर हा प्रश्न रस्त्यावर नेण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

-रामनाथ खोड, सामाजिक कार्यकर्ता

# इशान किशनच्या वादळात पाकिस्तान नेस्तनाबूत

भारतीय संघ झोकात सुपर-८ साठी पात्र झालाय कारण ईशान किशनने पाकिस्तान विरुद्धचा कालचा सामना आपल्या नावावर करून घेतला. पहिल्याच षटकात अभिषेक शून्यावर बाद झाल्यावर देखील ईशानने बेडरपणे फटकेबाजी केली मात्र समजून उमजून आणि ज्या मैदानावर १६० धावाही आव्हानात्मक असतात तिथं आपण १७५ धावांचं आव्हान पाकिस्तान समोर ठेवलं. पाकिस्तानची बॉलिंग वाईट नव्हती. फिल्डिंगही बरी होती. पण त्यांना हरायची सवय झालीये.पाकिस्तानचा सर्वात मिस्ट्री बॉलर तारिक उस्मान हा कुठूनही धावत येत मध्येच थांबून चेंडू टाकतो त्याच्या चार ओव्हर्स २४ धावा म्हणजे ठीक होत्या,त्याच्या शेवटच्या ओव्हरमध्ये सुर्यकुमार बाद झाला, ही त्याची एकमेव विकेट. तो येण्या आधीच इशांत किशनने सामना भारताच्या बाजूने झुकवला होता. तरीही तो असताना या आपल्या सगळ्यात मिस्ट्री बॉलरला पुढे आणणं पाकिस्तानला का सुचलं नाही ? कदाचित मग स्लॉग ओव्हरमध्ये कोणी बॉलिंग करायची हा प्रश्न




पाकिस्तानी कर्णधार सलमान आगाला पडला असावा,बरे त्याने पहिल्याच ओव्हरमध्ये विकेट घेऊनही पुन्हा बॉलिंग घेतली नाही ती का ? असाही प्रश्न पडतोच.ईशान किशनने जे फलंदाजीत केलं नेमकं तेच पहिल्या दोन ओव्हरमध्ये बुमराह आणि पंड्याने केलं.लागोपाठ ३ मुख्य फलंदाज बाद करून त्यांनी पाकिस्तानला जे बॅक फुटवर ढकललं त्यातून ते बाहेर येऊच शकले नाहीत.किशनच्या तुफानामुळे सूर्यकुमार आणि तिलक वर्मा डोक्यावर बर्फ ठेवून फलंदाजी करू शकले. पॉवर प्लेमध्ये सहा ४ बाद ३८ ही केवळ पाकिस्तानच्या पराभवाची पायाभरणी नव्हती तर पहिल्याच ओव्हरमध्ये अभिषेकला बाद केल्या नंतर लगेच शाहीन आफ्रिदीच्या ओव्हरमध्ये किशनचं सुसाट सुटणं, दहा ओव्हर्समध्ये ९० पार करणं, पंधराव्या ओव्हरपर्यंत आपल्या दोनच विकेट्स जाणं आणि शेवटच्या ओव्हरमध्ये पुन्हा शाहीन आफ्रिदीवर हल्ला ही पाकिस्तानच्या पराभवाची एक एक पायरी होती. पाकिस्तानचा डाव अपेक्षेप्रमाणे कोसळला. थोडे सावरत आहेत असं वाटत असतांना अक्षर पटेलक आणि वरून चक्रवर्तीने विकेट्स खेचून घेतल्या. एकूण नाणेफेक जिंकूनही धावांचा पाठलाग करायचा पाकिस्तानच्या कर्णधाराचा निर्णय म्हणजे अनाकलनीय होत ,पहिल्या ओव्हरमध्ये अभिषेक शर्मा बाद केल्याने पाकिस्तानी कर्णधार सलमान आगा त्यांच्या फिरकी गोलंदाजांच्या एवढा प्रेमात पडला की इशान किशनने त्या गोलंदाजांची तुफानी धुलाई कधी केली हे त्याला कळलेही नाही. त अभ्यास केला अभिषेक शर्माचा अन पेपर आला ईशान किशनचा अशी त्यांची अवस्था झाली. शाहीन आफ्रिदीला ते म्हणे पाकिस्तानचा प्रमुख बॉलर समजतात पण प्रत्यक्षात तो आता थकला आहे असे दिसते.१७५ धावा या पाकिस्तानी फलंदाजीच्या अवक्या बाहेरच्या होत्या हे खरे पण त्यांनी १८ ओव्हरमध्येच ११४ धावावर गाशा गुंडाळणं म्हणजे यापेक्षा या सामन्यावर बहिष्कार घालणं परवडलं असतं असं झालं. सामना संपल्यावर अनेक पाकिस्तानी फॅन याच आशयाचा वैताग व्यक्त करत होते.एकूण हा सामना हाय होलटेज झालाच नाही तर फुसका बार ठरला तसा तो ठरणारच होता पण मग आयसीसीचं आर्थिक गणित बिघडलं असतं म्हणून अट्टहास करून खेळवला गेला,चला पुन्हा एकदा भारताला पाकिस्तानची जिरवण्याची संधी मिळाली हे महत्वाचे.



**-महेश वाघमारे, बीड.**

# प्रशासक काळात पाणीपुरवठा टेंडरात करोंडोंचा भ्रष्टाचार

## संबंधित अधिकारी व नगरसेवकांवर कार्यवाही करा- रशिद शेख

### पाणीपुरवठा कामगारांचे हजेरीपट, किमान वेतन,पी एफ,इन्शुरन्स कागदावर

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषद माजलगाव मध्ये १५वा वित्त आयोग मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यता अंतर्गत माजलगाव शहर पाणीपुरवठा योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती करण्याबाबत सर्वसाधारण सभा दि.१४/०९/२०२१ ठराव क्र ९७ वरुन मंजूर दर ६,८९,९९९ रु प्रति महिना एक वर्षासाठी मंजूर ३१/०३/२०२२ रोजी अंबाजोगाई येथील कंपनीला देण्यात आला पण आर्थिक देवाणघेवाण करून मुदतवाढ तीन ते चार वर्षे



करुन करोंडा भ्रष्टाचार करण्यात आला असुन धातुर मातुर कामगार दाखवुन करोंडाचे बील पास करण्यात आला आहे.पाणीपुरवठा टेंडर चे कामगारांचे हजेरीपट नाही,किमान वेतन नाही,पीफ नाही, इन्शुरन्स नसुन फक्त कागदावरच संख्या दाखवून करोंडोंची बील पास करून राज्य सरकारला चुना लावणारे अधिकारी, कर्मचारी व संबंधित लोकांवर तात्काळ चौकशी करून कारवाई करा तसेच प्रशासक काळात झालेल्या कामांची चौकशी करणे जरुरी असुन पाणीपुरवठा टेंडर, स्वच्छता टेंडर, सिमेंट रस्ते व अन्य टेंडरांची चौकशी करण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने नगरपरिषद कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता रशिद शेख यांनी दिला आहे.

# डॉ.विक्रांत विधाते यांची के.बी.भाभा हॉस्पिटलमध्ये जनरल सर्जरी (डीएनबी) साठी निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा. शिवदास विधाते यांचे सुपुत्र आणि कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांचे पुतणे डॉ.विक्रांत विधाते यांची मुंबई येथील के.बी.भाभा हॉस्पिटलमध्ये जनरल सर्जरी (डीएनबी) साठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी आ.भीमराव धोंडे यांनी सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी ज्येष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, राजेंद्र धोंडे, अजय



धोंडे,अभय धोंडे, डॉ.डी.बी.राऊत, संजय शेंडे,संदीप ननवरे,प्राचार्य सुनील कोल्हे,इंजि. बाळासाहेब भुकन, उत्तम बोडखे, प्राचार्य डॉ.चंद्रकांत गोसावी,शिवाजी टेकाडे,प्रा.आर.जी. विधाते, सुदर्शन धोंडे, माऊली बोडखे, प्राचार्य श्रीराम आरसूळ, प्राचार्य संजय बोडखे, सेवानिवृत्त प्राचार्य अशोक टेकाडे,शिवशंकर टेकाडे, प्रा.अशोक खेडकर, रमेश गिरी, सुभाष वाघ,प्रा. राम बनसोडे,उद्धव विधाते,भगवान विधाते,विश्वजीत विधाते,डॉ. सत्यजित विधाते, अशोक विधाते, नवनाथ विधाते, पोपट वाळके सर आदीनी अभिनंदन केले. डॉ.विक्रांत ◀◀ पान ३ वर

# माजी उपसरपंच अभिमन्यू जगताप यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप व राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांचे वडील माजी उपसरपंच तसेच सर्वपरिचीत व्यक्तीमत्त्व अभिमन्यू आण्णा जगताप यांचे काल दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले आहे. त्यांच्यावर मागील पाच दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान रात्री १०:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सोमवारी वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, शासकीय, वैद्यकीय, व्यावसायिक, न्याय व्यवस्था यांसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून दिवंगत अभिमन्यू जगताप यांना श्रध्दांजली अर्पण केली.



# शिवजयंतीनिमित्त जामगावात शिवशंभो गर्जना संगीत सोहळा

## शिवभक्तीच्या सुरांनी दुमदुमणार परिसर ;पंचक्रोशीतील नागरिकांना उपस्थितीचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आष्टी तालुक्यातील जामगाव येथे भव्य आणि दैदिप्यमान संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवशंभो गर्जना या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण परिसर शिवभक्तीच्या सुरांनी दुमदुमणार आहे.



या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आमु जाधव आणि अभिजीत जाधव आपल्या जोशपूर्ण आवाजातून शिवभक्तीपर गीतांचा जागर सादर करणार आहेत. शिवरायांच्या पराक्रम, शौर्य, स्वाभिमान आणि हिंदवी स्वराज्याच्या महान संकल्पनेची गाथा संगीताच्या माध्यमातून सादर केली जाणार असल्याने उपस्थितांना प्रेरणादायी आणि रोमांचक अनुभव मिळणार आहे.

शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित हा सांस्कृतिक उपक्रम समाजजागृती, इतिहासाची जाण आणि तरुणांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे. मराठी संस्कृतीची परंपरा जपत शिवचरित्रातील तेजस्वी आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन समस्त जामगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले असून, गावाचे भूषण व मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस, ज्येष्ठ नेते देविदास आबा धस तसेच कर्तव्यदक्ष युवा सरपंच राधेश्याम भैय्या धस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे.

कार्यक्रमास आष्टी तालुका व पंचक्रोशीतील सर्व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच राधेश्याम भैय्या धस यांनी केले आहे. शिवजयंती निमित्त जामगावात आयोजित हा भव्य सांस्कृतिक सोहळा परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, शिवरायांच्या आदर्शांचे स्मरण करून देणारा ऐतिहासिक क्षण अनुभवण्याची संधी या निमित्ताने लाभणार आहे. या कार्यक्रमाचे इव्हेंट मॅनेजमेंट बीड येथील ड्रीमला निवेद मॅनेजमेंट रविराज आबा जेधे यांनी केले आहे.

# माजलगावमध्ये जातीय शिवीगाळ व जीवघेणा हल्ला; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील रविवारी रात्री घडलेल्या मारहाण प्रकरणी पाच जणांविरुद्ध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जातिवाचक शिवीगाळ, जीवे मारण्याचा प्रयत्न व धमकी दिल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली.

फिर्यादी शुभम रुपचंद कांबळे (वय २४, रा. जयभीमनगर, माजलगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते साबळे हॉस्पिटल येथे कंपाउंडर म्हणून कार्यरत आहेत. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता ड्युटी संपवून स्कुटी ( २३ ५१९३) वरून घरी जात असताना चव्हाण हॉस्पिटलसमोर आरोपी रवि मारोती कुन्हाडे (रा. वडारवाडा) याने पल्सर मोटारसायकलवरून स्कुटीला कट मारला.

स्कुटीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असल्याचे पाहून आरोपीने जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर आरोपीने मुद्दाम स्कुटीला धडक देऊन त्यांना खाली पाडले. यावेळी विशाल नागोराव चव्हाण, विलास नागोराव चव्हाण, राहुल नागोराव चव्हाण व लक्ष्मण भगवान शिंदे हे घटनास्थळी येऊन सर्वांनी मिळून मारहाण केली, असे तक्रारीत नमूद आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच पोट व छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कसाबसा सुटका करून ते माजलगाव शहर पोलीस ठाण्याकडे गेले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनाही आरोपींनी मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.



# ढेकणमोहा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा तांडा येथे बंजारा समाजाचे आद्यदैवत, थोर तत्वज्ञ, महान विचारवंत, समाजसुधारक श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती प्रतिवर्षा प्रमाणे साजरी करण्यात आली यां प्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार पिपळनेर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी चंदकांत फड बीड जिल्हा कोषाध्यक्ष भाजप, भाऊराव नाना सुरवसे, डॉ. अमोल घुमरे सर, उद्धव दादा म्हेत्रे, बाबासाहेब काळे, नागेश शिंदे माजी सरपंच ढेकणमोहा, विष्णू पवार माजी सरपंच ढेकणमोहा तांड, साहेबराव पवार माजी ◀◀ पान ३ वर

# महाशिवरात्री निमित्त तीन दिवसीय महोत्सव उत्साहात

## आ.धस यांनी भक्तांच्या रांगेत उभे राहून घेतले पिंपळेश्वरांचे दर्शन

आष्टी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र पिंपळेश्वर महादेव देवस्थान मंदिरात महाशिवरात्री उत्सवानिमित्त तीन दिवसीय महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे आयोजन श्री पिंपळेश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, श्री पिंपळेश्वर देवस्थान समिती आष्टी तसेच समस्त ग्रामस्थ आष्टी मुर्शदपुर यांच्या वतीने करण्यात आले होते.

उत्सव काळात दररोज अभिषेक, महाआरती व दैनंदिन महाआरतीचे आयोजन करण्यात आले. तसेच कीर्तन केसरी ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोठुळे



भिवंडीकर यांचे प्रभावी कीर्तन पार पडले. त्यांच्या कीर्तनातून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. ◀◀ पान ३ वर

# महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांच्या पहाटेपासून दर्शनासाठी रांगा; साडेसातशे क्विंटल साबुदाणा खिचडी प्रसाद वाटप

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पिंपळेश्वर मंदिर, कडा, रुईनालकोल, महादेव दरा, भवरदरा भाविकाला सहज दर्शन होण्यासाठी पोलिसांचा, मंदिर समितीचा चोख बंदोबस्त; मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात महाशिवरात्री उत्सव साजरा

निमित्त आष्टी तालुक्यातील शिवालयात शिवभक्तांनी तुफान गर्दी केली होती पिंपळेश्वर मंदिर आष्टी, महेश मंदीर कहा, महेश मंदीर रुईनालकोल, महादेव दरा, भवरदरा ठिकठिकाणी गावा गावातील शिवायलामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवमंदिरांमध्ये विद्युत रोषणाई,



आकर्षक रंगरंगोटी, ने सजली असून ठिकठिकाणी सप्ताह, किर्तन, यात्रा, महादेवाच्या मंदिराच्या परिसरात ओम नमः शिवायच्या जयघोषात सुरू असलेले अभिषेक, महारूद्राभिषेक, होमहवन अशा विविध धार्मिक कार्यक्रम महाशिवरात्री निमित्त महादेव मंदिरात मोठ्या संख्येने भाविकांनी अगदी पहाटेपासूनच गर्दी केली होती. भाविकांच्या लांबच लांब रांगा मंदीरा बाहेर दिसून येत होत्या. हर हर महादेव.. जय भोले च्या गजरात आष्टी तालुक्यातील शिवालय भाविकांच्या अलोट

गर्दीने भोलेनाथाच्या जयघोषाने दणाणले होती. हजारो भक्तांनी दुपारपर्यंत मंदिरात दर्शनासोबत महाप्रसादाचाही लाभ घेतला. आष्टी तालुक्यात अनेक प्राचीन पुरातन मंदिरे आहेत. जी लोक वस्तीपासून हाकेच्या अंतरावर आहेत. व तालुक्यात ठिकठिकाणी शिवालये असून ठिकठिकाणच्या महादेवाच्या मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त धार्मिक कार्य शिवलिंगाला दूध आणि जलाचा अभिषेकआणि त्यानंतर बेलाची पाने वाहत बम भोलेच्या गर्जनेत यथासांग भाविकांनी पूजा केली. भाविकांकडून अभिषेक, प्रसादवाटप, भजन, कीर्तन अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरांवर रोषणाई करण्यात आली आहे.

◀◀ पान ३ वर

# आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू

## जिल्ह्यात २ हजार ४०० विद्यार्थ्यांना मिळणार आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश

## पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा - मनोज जाधव



बीड । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला आज मंगळवार (दि. १७ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. त्यानुसार पालकांना मुलांचे अर्ज १० मार्चपर्यंत भरता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ९ जानेवारी रोजी शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली होती. मुदतवाढीसह ही प्रक्रिया ३० जानेवारी रोजी बंद करण्यात आली. जिल्ह्यात प्रवेशासाठी २१३ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ४०० जागा उपलब्ध आहेत. मंगळवारपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असून पात्र पालकांनी आपल्या पाल्याचे अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन मनोज जाधव यांनी केले आहे. पोद्दार इंग्लिश स्कूलने ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ । पान ७



# आई मला ब्लॅकमेल केलं...!

## बारामतीत तरुणानं उचललं टोकाचं पाऊल; पीएसआय पिता- तरुणीविरोधात गुन्हा

**बारामती । प्रतिनिधी**

शहरातील रुई-बयाजीनगर भागात विक्रम उर्फ बबलू नवनाथ कोळपे (वय २३) या तरुणाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने लिहिलेली चिठ्ठी पोलिसांना मिळाली असून तरुणीने त्याला ब्लॅकमेल केल्याने व तिच्या कुटुंबियांनी त्याचा मानसिक छळ केल्याने आत्महत्या करत असल्याचे त्याने म्हटले आहे. आरोपी तरुणीचे वडील पुणे पोलिस दलात उपनिरीक्षक पदावर कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी सृष्टी विकास मते, श्रुती विकास मते या बहिणींसह त्यांचे वडील विकास मते (सर्व रा. खडकवासला, पुणे) यांच्या विरोधात बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली.

या प्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात मयत विक्रम याचे मामा सत्यवान आप्पा इंगळे (रा. वाफेगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांनी फिर्याद दिली. दि. १५ रोजी सायंकाळी ७ ते ७.४५ या दरम्यान ही घटना घडली. रविवारी सायंकाळी विक्रम याने त्याची बहीण सानिका हिला मंदिरात पाठवले. ती मंदिरातून घरी आली असता दरवाजाला आतून कडी लावल्याचे दिसून आले. तिने भाऊ विक्रम याला आवज दिला परंतु दरवाजा उघडला गेला नाही. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांची मदत घेत खिडकीच्या गजावाटे दरवाजा उघडून आत पाहिले असता किचनच्या खोलीत विक्रम याने लोखंडी हुकाला साडीने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्याला उतरवून घेत तात्काळ येथील रुई ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले.



विक्रम याच्याकडे मिळून आलेल्या चिठ्ठीमध्ये त्याने 'आई मला माफ कर, मला खूप त्रास होतोय म्हणून मी आज हा निर्णय घेतो आहे. माझ्या आत्महत्येचे कारण फक्त सृष्टी मते ही आहे. तिने मला ब्लॅकमेल केले, माझा मानसिक छळ केला. पाच वर्षे माझा वापर केला गेला. लग्नाचे खोटे आश्वासने दिले गेले. पण जेव्हा वेळ आली तेव्हा घरच्यांचे कारण सांगून तिने फसवले. माझ्याकडे चॅट, फोटोज होते. तिच्या वडीलांच्या सांगण्यावरून मला पुण्याला बोलावून घेत पुढे कोणताही प्रूफ नको म्हणून ते डिलिट करण्यात आले. तेथे तिच्या बहिणीने तुला अडकवेन अशी धमकी दिली. विशेष म्हणजे आम्ही भेटलो तेथे त्या पूर्ण तोंड बांधून आल्या होत्या. सिंहगड कॉलेजच्या खाऊगल्लीत गोयल गंगा येथे लस्सी-वस्सी शॉपचे २७ डिसेंबरचे सीसीटीव्ही फुटेज चेक करा. ती मला ५ जानेवारीला भेटायला आली तेव्हाही मी तिला समजून सांगितले. त्याचं व्हॉईस रेकॉर्ड सुद्धा आहे. तेव्हा ती बोलली मला लग्न करायचे नाही', अशा प्रकारचा मजकूर या चिठ्ठीमध्ये आहे.

विक्रम तिच्या बहिणीसह ५ जानेवारीला सृष्टी हिला पुण्यात भेटला होता. त्यावेळीही सृष्टी हिने वडीलांचा विरोध असल्याने मला लग्न करायचे नाही असे सांगितले होते. विकास मते यांना फोन करून भेटण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन वरून दमदाटी केली. त्यानंतर विक्रम बारामतीत गावी निघून आला. या प्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी तिघांविरोधातभारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०८, ३५१(२), ३५१(३), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सुसाईड नोट, मोबाईल डेटा, कॉल रेकॉर्ड्स व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# आधार व अपार आयडीशिवायही एमएचटी सीईटी २०२६ अर्ज भरण्याची मुभा

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने २०२६ च्या नोंदणीसाठी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. तांत्रिक अडचणींमुळे आधार किंवा अपार आयडी नसलेले विद्यार्थी आता त्याशिवायही एमएचटी सीईटीचा अर्ज भरू शकतात. ही सवलत १३ फेबुवारी २०२६ पासून लागू झाली आहे.

सीईटी सेलला असे आढळून आले की, काही उमेदवारांना सीईटी २०२६ नोंदणी प्रक्रियेदरम्यान आधार आणि अपार प्रमाणीकरण पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. तांत्रिक किंवा इतर खऱ्या समस्यांमुळे आधार आणि अपार प्रमाणीकरण पूर्ण करण्यात अक्षम असलेल्या उमेदवारांना आधार आणि अपार प्रमाणीकरणाशिवाय नोंदणी पोर्टलवर अर्ज भरून सबमिट करण्यास मदत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

जे उमेदवार आधार आणि अपार प्रमाणीकरण वापरून नोंदणी फॉर्म भरू शकतात त्यांनी पूर्वसूचित नोंदणी प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे. एमएचटी सीईटी नोंदणी २० फेबुवारी २०२६ रोजी बंद होईल. पहिल्या टप्प्यातील परीक्षा ११ एप्रिल ते २६ एप्रिल आणि दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा १० ते १७ मे २०२६ दरम्यान होईल. ही परीक्षा दोन सत्रांमध्ये होईल. पहिले सत्र सकाळी ९ ते दुपारी १२ आणि दुसरे सत्र दुपारी २ ते संध्याकाळी ५ या वेळेत होईल. अधिक माहितीसाठी उमेदवार सीईटी सेलच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकतात.

MHT-CET
Maharashtra Common Entrance Test

## पुण्यात ऑनलाईन अत्याचार प्रतिबंध आणि कायदेशीर प्रतिसादावर कार्यशाळा




**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुणे शहर शाखा आणि रती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एस. एम. जोशी फाऊंडेशन येथे ऑनलाईन शोषण, रिपोर्टिंग प्रणाली, कायदेशीर प्रतिसाद व पीडितांसोबत कसे काम करावे या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेत प्रशिक्षक उमा सुब्रमणियन, सलमान मुजावर आणि रितू जैन यांनी ऑनलाईन धोके, गुन्हेगारांचे वर्तन, पीडितांचे अनुभव आणि तक्रार प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. प्रोजेक्टर सादरीकरण, रोल प्ले आणि संवादात्मक चर्चेद्वारे विषय प्रभावीपणे मांडण्यात आला. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि चाकण येथील ४८ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचा उद्देश ऑनलाईन अत्याचारांविरोधात सजगता निर्माण करणे, पीडितांना सक्षम मदत देणे आणि कायदेशीर प्रक्रियेची माहिती पोहोचवणे हा होता. कार्यक्रमाचा समारोप सहभागींच्या मनोगतांनंतर करण्यात आला.

## पुणे विद्यापीठाचा मोठा दणका! ५०% प्राध्यापक नाहीत? तर २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया रोखली जाणार

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांतील रिक्त जागांच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतल्याने संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये किमान ५० टक्के मान्यताप्राप्त प्राध्यापक कार्यरत नसतील, त्या महाविद्यालयांना २०२६-२७ साठी प्रथम वर्षाचे प्रवेश घेता येणार नाहीत, असा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाने कंबर कसली आहे.

महाविद्यालयांमध्ये नियमित स्वरूपात नियुक्त आणि विद्यापीठाची मान्यता असलेले किमान ५० टक्के प्राध्यापक असणे अनिवार्य आहे. ही अट पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयांना ३१ मार्चची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत प्राध्यापक भरती न झाल्यास संबंधित महाविद्यालयाच्या नवीन तुकड्यांना टाळे लागणार आहे. विद्यापरिषदेने २४ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत हा ठराव संमत केला होता.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०८(१) (च) नुसार, महाविद्यालयांना पुरेशा सोयीसुविधा आणि शिक्षक असणे ही संलग्नीकरणाची मुख्य अट



आहे. मात्र, अनेक महाविद्यालये या नियमांना केराची टोपली दाखवत असल्याचे निदर्शनास आले होते. यावर तोडगा म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग आणि शासन यांच्या मानकांनुसार प्राध्यापकांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आढळल्यास प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात येईल. विशेष म्हणजे, ही अट केवळ नियमित शिक्षकांसाठीच नाही, तर विद्यापीठ मान्यता असलेल्या तदर्थ प्राध्यापकांसाठीही लागू असेल.विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रदिप कोळी यांनी या संदर्भातील परिपत्रक सर्व संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्थांना पाठविले आहे. ज्या संस्था ३१ मार्च २०२६ पूर्वी प्राध्यापकांची संख्या ५० टक्क्यांवर नेणार नाहीत, त्यांच्या २०२६-२७ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधितांनी याची नोंद घेऊन कार्यवाही करावी, असे परिपत्रकात म्हटले आहे.अनेक खासगी कॉलेजांमध्ये केवळ नफेखोरीसाठी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये फी उकळली जाते, मात्र शिकवण्यासाठी प्राध्यापक नसतात. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे आता विना प्राध्यापक महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांचे दुकान बंद होण्याची शक्यता आहे. ३१ मार्चनंतर कोणत्या महाविद्यालयांवर कुऱ्हाड कोसळणार याचे चित्र स्पष्ट होईल.

## येरवड्यात मित्राकडूनच मित्राचा खून

**पुणे । प्रतिनिधी**

येरवड्यात दारू पिताना झालेल्या वादातून एकाने आपल्या मित्राचा खून केला. माशाक गाझीबक्ष विजापुरे (४०, रा. येरवडा) याचा खून झाला असून याप्रकरणी गणेश वसंत शिंदे याला अटक झाली आहे.माशाक आणि गणेश मित्र आहेत. दोघेजण शनिवारी दुपारी कामराजनगर परिसरात दारू पित होते. यावेळी किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. माशाकने गणेश याला शिवीगाळ केली. गणेशने शेजारी पडलेले दांडके उचलून माशाकच्या डोक्यात घातले.


माशाकच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो बेशुद्ध पडला. गणेशने त्याला शुद्धीत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने प्रतिसाद न दिल्याने गणेश घाबरला आणि पसार झाला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी घटनास्थळी भेट दिली. माशाकला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पसार आरोपी गणेश याला पोलिसांनी सायंकाळी अटक केली.

## पुणे -नागपूरसह 'या' शहरांसाठी सुटणार जादा गाड्या

**पुणे । प्रतिनिधी**

होळी उत्सवानिमित्त नागपूरसह उत्तर भारतातील प्रमुख शहरांसाठी विशेष गाड्या धावणार आहेत. प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता पुण्यातून धावणाऱ्या दानापूर, गोरखपूर, नागपूर आणि हजरत निजामुद्दीनसाठी ह्या रेल्वे गाड्या धावणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. या सर्व विशेष गाड्यांचे आरक्षण १८ फेब्रुवारीपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर सुरू होणार आहे.

पुणे-गोरखपूर दैनिक विशेष ३२ फेऱ्या, पुणे-दानापूर दैनिक विशेष ३२ फेऱ्या आणि पुणे-दानापूर द्वि-साप्ताहिक ८ फेऱ्या धावणार आहेत. त्यानुसार पुणे-नागपूर गाडी क्रमांक ०१४६९ (साप्ताहिक) ही गाडी पुण्यातून २४ फेब्रुवारी व ३ मार्च रोजी दुपारी १ वाजून ५० मी. पुण्याहून सुटेल. तर नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसहा वाजता पाहोचेल. तर गाडी क्र. ०१४७० ही २५ फेब्रुवारी व ४ मार्च रोजी सकाळी आठ वाजता



नागपूरहून निघेल. पुण्यात त्याच दिवशी रात्री साडेअकरा वाजता पोहोचेल. पुणे-गोरखपूर दैनिक विशेष गाडी क्र. ०१४१५ ही गाडी २१ फेब्रुवारी ते ८ मार्चदरम्यान दररोज सकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पुण्याहून सुटेल. दुसऱ्या दिवशी दुपारी चार वाजता गोरखपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०१४१६ ही २२ फेब्रुवारी ते ९ मार्चदरम्यान दररोज सायंकाळी साडेपाच वाजता गोरखपूर येथून निघून पुण्यात तिसऱ्या दिवशी पहाटे सव्वातीन वाजता पोहोचेल. पुणे-दानापूर द्वि-साप्ताहिक गाडी क्र. ०१४४९ ही दि. २१ फेब्रुवारी ते ८ मार्चदरम्यान दररोज दुपारी साडेतीन वाजता पुण्याहून निघेल. तिसऱ्या दिवशी पहाटे पावणेतीन वाजता दानापूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०१४५० ही दि. २३ फेब्रुवारी ते १० मार्चदरम्यान दररोज सकाळी पाच वाजता दानापूर येथून निघून पुण्यात दुसऱ्या दिवशी सायंकाळी सव्वासहा वाजता पोहोचेल. पुणे-दानापूर द्वि-साप्ताहिक गाडी क्र. ०१४८१ दि. २३, २७ फेब्रुवारी व २, ६ मार्च रोजी सायं. ७:५५ वा. पुण्याहून निघून तिसऱ्या दिवशी पहाटे ४:२० वा. दानापूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०१४८२ दि. २५ फेब्रुवारी, १, ४, ८ मार्च रोजी सकाळी ८:०० वा. दानापूर येथून निघून पुण्यात दुसऱ्या दिवशी सायं. ६:१५ वा. पोहोचेल.

## खेळतांना ३ वर्षांची चिमुकली १५ फूट खोल खड्ड्यात पडली ; वाकडमध्ये बिल्डरवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील पिंपरी-चिंचवडमधून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. वाकड येथील पिंक सिटी रोडवर असलेल्या अस्वानी गॅलक्सी सोसायटीमध्ये खेळत असताना एका चिमुकलीचा दुर्दैवी अपघात झाला आहे. सुरक्षेअभावी एका ३ वर्षीय बालिकेला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन आणि निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत बिल्डर आणि पार्किंग सिस्टमच्या संचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ९ च्या सुमारास अस्वानी गॅलक्सी सोसायटीच्या गार्डनमध्ये श्रीजा अनिल सांगळे (वय ३ वर्षे ९ महिने) ही चिमुकली इतर मुलांसोबत खेळत होती. या गार्डनच्या अगदी जवळच एफ विंगचे पार्किंग पिट खड्डा आहे. मात्र, या खड्ड्याला कोणतीही संरक्षक भिंत, कठडा किंवा साधी जाळी देखील लावलेली नव्हती. खेळण्याच्या ओघात श्रीजा या अर्धवट बांधकाम असलेल्या १५ फूट खोल खड्ड्यात पडली. या अपघातात तिच्या डोक्याला आणि पाठीला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, अस्वानी पॅराडाईज कंपनीचे बिल्डर आणि किंग मल्टीलेव्हल कार पार्किंग सिस्टमचे संचालक जगन्नाथ राऊत यांच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्किंगच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना न केल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. वाकड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेनंतर पालकांमध्ये रोष दिसून आला.



## राजकीय आंदोलनातील दगडफेक प्रकरणात पोलीस आयुक्तांनी भूमिका स्पष्ट करत दिले निर्देश

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात नुकत्याच झालेल्या राजकीय आंदोलनादरम्यान उद्भवलेल्या तणावपूर्ण परिस्थितीबाबत पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी अधिकृत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या घटनेला अत्यंत दुर्दैवी संबोधत पोलिसांनी वेळेवर मध्यस्थी करून कायदा व सुव्यवस्था राखल्याचे स्पष्ट केले.आयुक्तांनी सांगितले की, आंदोलनादरम्यान परिस्थिती चिघळून दगडफेक झाल्याने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.सरकारी धोरणे



या प्रकरणात दोन्ही पक्षांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून दोषींवर पुढेही कठोर कारवाई होणार आहे, असे त्यांनी नमूद केले. पोलिसांना आंदोलन हिंसक होईल अशी पूर्वकल्पना नव्हती. दगडफेक किंवा हिंसाचार होईल अशी कोणतीही गुप्त माहिती आमच्याकडे नव्हती. अशी माहिती असती तर परवानगी दिली नसती, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. पुढील काळात कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयावर किंवा नेत्यांच्या निवासस्थानावर आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असा महत्त्वाचा निर्णयही त्यांनी जाहीर केला.महापौरवर गुन्हा दाखल का नाही? याबाबत विचारले असता आयुक्तांनी सांगितले की, पोलिसांकडे प्राप्त झालेल्या फिर्यादीच्या निवेदनानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपासात जो दोषी आढळेल त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई होईल. काँग्रेस भवन आंदोलन परवानगीबाबत आयुक्त म्हणाले की, आंदोलन हिंसक होईल अशी माहिती नसल्यामुळे परवानगी देण्यात आली होती. मात्र भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जाणार आहे आणि अशा स्वरूपाच्या आंदोलनांना परवानगी दिली जाणार नाही. काँग्रेसच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, पोलिसांनी नियमानुसार आणि कायद्यानुसारच कारवाई केली असून आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही.

## जखमी कार्यकर्त्यांची काळजी घ्या, कसलीही कसर ठेवू नका; पुण्यातील भाजपच्या राड्यानंतर हर्षवर्धन सपकाळांचा काँग्रेस कार्यकर्त्यांना फोन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात भाजप (इगझ) आणि काँग्रेस (उेपसीर्शी) कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या जोरदार झटापटीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (र्क्षीहीरीवहरप डरज्ञिरश्र) यांनी तातडीने दखल घेतली आहे. या घटनेची सविस्तर माहिती घेण्यासाठी सपकाळ यांनी पुणे काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. तसेच या राड्यात जखमी झालेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांचीही त्यांनी थेट फोन करून विचारपूस केली.

फोनवर बोलताना सपकाळ यांनी अरविंद शिंदेंना स्पष्ट सूचना दिल्या. जखमी कार्यकर्त्यांच्या उपचारांची संपूर्ण



जबाबदारी घ्या. त्यांच्या दवाखान्याची, तपासण्यांची योग्य काळजी घ्या. कोणतीही कसर राहू देऊ नका, असा सल्ला त्यांनी दिला.या राड्यात भाजपकडून करण्यात आलेल्या दगडफेकीत काँग्रेसचा एक कार्यकर्ता गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या डोक्याला सात टाके पडले असून प्राथमिक उपचारानंतर त्याला घरी सोडण्यात आले आहे. मात्र, सीटी स्कॅन करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला असल्याची माहिती काँग्रेसकडून देण्यात आली आहे. दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्याबाबत केलेल्या तुलनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ पुण्यात भाजपकडून आंदोलन करण्यात येत असतानाच भाजप व काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला होता. या घटनेनंतर सपकाळ यांनी सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, माझ्या वक्तव्याची मोडतोड करून 'ध' चा 'मा' करण्यात आला. देवेंद्र फडणवीस यांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, असे मी आधीच सांगितले होते. त्याचा प्रत्यय आज पुण्यात आला, पुण्यातील भाजपच्या गुंडांनी पोलिसांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यालयावर हल्ला करत दगडफेक केली. यात काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या आणि पत्रकार भगिनींवर प्राणघातक हल्ला झाला. या भाजपच्या गुंडगिरीचा आम्ही तीव्र निषेध करतो, असे सपकाळ म्हणाले.

## पुण्यात पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन; २३ जणांविरुद्ध गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिसांकडून आंदोलनासाठी परवानगी नाकारण्यात आली असताना देखील जंगली महाराज स्त्यावर पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन करणाऱ्या एका संघटनेच्या २३ कार्यकर्त्यांविरुद्ध डेक्कन पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला.





जंगली महाराज रस्त्यावरील श्री छत्रपती संभाजी उद्यान परिसरात रविवारी (दि.१५) सकाळी साडेदहा ते अकरा वाजताच्या सुमारास एका संघटनेकडून पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन करण्यासाठी संबंधित संघटनेकडून पोलिसांकडे परवानगी मागितली होती. पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. पोलिस परवानगी न घेता आंदोलन केल्याप्रकरणी पोलिसांनी २३ कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन त्यांना डेक्कन पोलिस ठाण्यात आणले. पोलिसांनी त्यांना नोटीस बजावून सोडून दिले. याबाबत पोलिस हवालदार नलिन येरुणकर यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महापालिकेच्या वर्धापनदिनानिमित्त श्री छत्रपती संभाजी उद्यानात पुष्प प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या प्रदर्शन पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. त्यामुळे संबंधित संस्थेकडून आयोजित केलेल्या आंदोलनास परवानगी नाकारण्यात आली, अशी माहिती डेक्कन पोलिसांनी दिली. सहायक पोलिस निरीक्षक जाधव तपास करीत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भूमिका, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लवकरच इस्राईलला भेट देणार आहेत. पॅलेस्टिनी नागरिकांच्या मागण्यांकडे होणारे दुर्लक्ष, विरोधी भूमिकेचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन आयोजित केले होते. मात्र, पोलिसांनी शांततामय मार्गाने करण्यात येणाऱ्या आंदोलनास परवानगी नाकारून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले, असा आरोप कार्यकर्त्यांनी केला.